# श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम,
# तुळजापूर विकास प्राधिकरण, दिनांक २३/०५/२०१३ बैठक इतिवृत्त

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत व खालील विषयावर चर्चा करणे करिता, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक गुरूवार दिनांक २३/०५/२०१३ रोजी, दुपारी ३:०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे संपन्न झाली. सदर बैठकीस सन्माननीय सदस्य व तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत संबंधित कार्यान्वयीन अधिकारी उपस्थित होते.

**विषय क्रमांक १:- दिनांक ०८/०२/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक ०८/०२/२०१३ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ, उचित कार्यवाहीसाठी आणि अनुपालनास्तव, सर्व सन्माननीय सदस्य आणि कार्यान्वयीन यंत्रणांना पाठविण्यात आलेले आहेत. तरी इतिवृत्तास मान्यता दयावी ही विनंती. नगर परिषद अंतर्गत नळदुर्ग रोड ते सर्कीट हाऊस १२ मी. रूंदीच्या रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे या कामासाठी ४०० मी. लांबीच्या रू. १४,९०,८००/- किंमतीस प्रशासकीय मान्यता देणेसाठी तातडीने तुळजापूर विकास प्राधिकरण समितीचा अधिसूचना ठराव क्र. २१६ मंजूर करण्यात आला. तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या कामांवर सनियंत्रण ठेवण्यासाठी श्री माणिक पाटलोबा दराडे (सेवानिवृत्त उपअभियंता) यांना तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती आदेश देण्याकरीता तातडीने तुळजापूर विकास प्राधिकरण समितीचा ठराव क्र. २१७ सर्वानुमते मंजूर करण्यात आला. वरीलप्रमाणे दोन्ही (circulation) ठरावास व इतिवृत्तास मान्यता देणेबाबत सदस्य सचिव, तु.वि.प्रा. यांनी विनंती केली असता त्यावर सविस्तर चर्चा होवून इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक २:- तुळजापूर शहरातील ऐतिहासिक कुंडाचे सुशोभिकरण करणे कामाच्या निविदेस मंजुरी देणेबाबत चर्चा करणे.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत तुळजापूर शहरातील ऐतिहासिक कुंडाचे सुशोभिकरण करणे रू.५७.४२ लाख किंमतीच्या ढोबळ अंदाजपत्रकास दिनांक १६/०६/२०११ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

पात्र निविदा धारकांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला असता एस.एम.आवताडे, मंगळवेढा यांनी दिलेले निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% ज्यादा दराची आहे. दि. ४/१०/२०११ रोजी एस.एम.आवताडे, मंगळवेढा यांना Negotation साठी लेखी कळविण्यात आले आहे. संबंधितांनी निगोशिएशन मध्ये दर कमी केले तर निविदा स्विकारावी अशी विनंती मुख्याधिकारी, नगर परिषद तुळजापूर यांनी दिनांक १५/१०/२०११ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीत केली होती. मंकावती तिर्थ, भगवती विहिर, अहिल्याबाई विहिरीचे काम करावे. दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सुचनेप्रमाणे मुख्याधिकारी यांनी रू. ५७.४२ लक्ष किंमतीचे परिशिष्ट-ब तयार करण्यात आले असून त्यामध्ये सहा ऐतिहासिक कुंडांचे सुशोभिकरण करणे बाबतचा प्रस्ताव बैठकीत मांडला असता प्रशासकीय मान्यता रू. ५७.४२ लक्ष मर्यादेत निविदा संबंधितांशी वाटाघाटी करून मान्यतेस्तव पुढील बैठकीत सादर करावे असे दि. २८/०७/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रस्ताव चर्चेसाठी सादर केला असता कुंडांच्या सुशोभिकरणाचे काम यंत्रणा म्हणून नगर परिषदेमार्फत करण्यास मुख्याधिकारी यांनी नकार दिला असता मा.अध्यक्ष यांनी अशा प्रकारचे वक्तव्य अथवा निर्णय आपणास तसेच नगर पालिकेस घेता येणार नाही अन्यथा आपल्याविरूध्द व नगर पालिकेविरूध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही केली जाईल असे सूचित केले. तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत नियुक्त सल्लागार मे.सराह कन्सलटन्सी, नाशिक पॅकेज क्र.०३ यांनी प्रस्तावित कामाबाबत ppt चे सादरीकरण तयार करावे व सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत विषय चर्चेसाठी ठेवावा असे दिनांक ०८/१०/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये सूचना दिलेल्या होत्या, त्यानुसार श्रीमती अमृता पवार मे. सराह कन्सलटन्सी, नाशिक यांनी सादरीकरणाद्वारे चार कुंडांची माहिती सभागृहास दिली. सदरील काम रोजगार हमी योजनेतून घेता येऊ शकते. तसेच सर्व कुंडांना झरे रिचार्ज होण्याकरीता आजुबाजूला असलेल्या घरांच्या छतावरील पाण्याचे पुनर्भरण कुंडामध्ये करण्यात यावा. याबाबत घरमालकांशी न.प.ने चर्चा करावी. त्यांची संमती असल्यास होणारा खर्च शासकीय निधीमधून करावा, तसेच गाळाची खोली प्रत्यक्षात किती आहे याची शहानिशा पुनःश्च करून घ्यावी असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचित केले होते,

सदरील विषय चर्चेस आला असता आजुबाजूच्या घरमालकांशी चर्चा केल्याचे श्री तळेकर नगर अभियंता यांनी सांगितले. पुनर्भरणाबाबत सराह कन्सलटन्सीने तांत्रिकदृष्ट्या पाहणी करून इस्टिमेट तयार करावे. सद्यःस्थितीत सहा कुंडापैकी मंकावती व भगवती या दोन कुंडाचे काम महात्मा फुले जलभुमि अभियान मधून पूर्ण करावे असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचित केले.

**विषय क्रमांक ३:- तुळजापूर शहरातंर्गत ३० मुख्य रस्त्याच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर शहरातील विविध २७ मुख्य अंतर्गत रस्त्यांच्या कामांचे एकुण रू. २५०२.२२ लक्ष किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले होते. त्यानंतर त्यांनी दि.०८/१०/२०१२ रोजी बैठकीमध्ये ३० रस्त्यांसाठी रू.२५७४.०० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विनंती केली होती. सदरील कामे हाती घेण्यासाठी निधी उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत लेखाधिकारी तु.वि.प्रा. तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन निधी उपलब्ध असल्यास प्रशासकीय मान्यता द्यावी असे दिनांक ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले होते.

सदरील विषयी निधीच्या उपलब्धतेबाबत लेखाधिकारी यांना विचारले असता लेखाधिकारी यांनी सध्या प्रशासकीय मान्यता देण्याकरीता रू. ३२५०३.७६ लक्ष मधून मंजूर असलेल्या प्रशासकीय मान्यता किंमत रू. ३१३७०.१० लक्ष वजा जाता रू. ११३३.६६ लक्ष किंमतीस कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल, अशी माहिती दिली. त्यानुसार प्राधान्यक्रमाने रस्त्याची निवड करून प्रस्ताव तयार करावा, तसेच मंदिर परिसरातील रस्त्यांना प्राधान्य द्यावे व सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील बैठकीत ठेवण्यात यावा, असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.

**विषय क्रमांक ४:- राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूचे (सर्व्हिस) रस्ते विकसीत करणे कामाच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर शहरातुन जाणा-या राष्ट्रीय महामार्ग (उस्मानाबाद रोड) व राज्य महामार्ग (नळदुर्ग, लातुर रोड) च्या दोन्ही बाजूस सेवामार्ग व सामासीक अंतरातील कच्ची / पक्की बांधकामे हटवून भुयारी गटार योजना व पाणी पुरवठा योजनेच्या नवीन लाईनचे काम युध्द पातळीवर चालु आहे. भविष्यात आता काढुन टाकलेली अतिक्रमणे व विनापरवाना बांधकामे परत होवू नयेत व देखभाल दुरूस्तीसाठी या जागा कायमच्या मोकळया राहाव्यात यासाठी सदरचे रस्ते/जागा खडीकरण डांबरीकरण करणे आवश्यक आहे. खालील रस्त्याच्या कामाचे खडीकरण, डांबरीकरण व वृक्षारोपनासह मे कॅशेक इंजि. यांचेकडून रू.४५०.०० लाख ढोबळ किंमतीचे अंदाजपत्रके तयार केली असुन, त्यास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली होती. (रू. लाखात)

| अ.क्र | कामाचे नाव | कॅशेक कन्सलटंट यांनी दिलेल्या ढोबळ अंदाजपत्रका प्रमाणे किंमत | का.अ. सा. बां.वि. उस्मानाबाद यांनी दिलेली अंदाज पत्रकीय किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ पूर्व बाजूचा बस स्टॅन्ड ते नप हद्द सर्व्हीस रोड लांबी १२८० मी. रूंदी १२ मी. | ११४.०० | ४१४.९४ |
| २ | राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ पश्चिम बाजु ६ मी रूंदीचा ७२० मी. व १२ मी. रूंदीचा १०८० मी. प्रमाणे लांबी १८०० मी. | १५६.०० | ४६०.५४ |
| ३ | नळदुर्ग रोड पूर्व बाजु सर्व्हीस रोड १२ मी. १००० मी. लांबी | ९०.०० | ३५३.९८ |
| ४ | नळदुर्ग रोड पश्चिम बाजु सर्व्हीस रोड १२ मी. लांबी १००० मी. | ९०.०० | ३६९.५४ |
| | **एकुण** | **४५०.००** | **१५९९.००** |

सदरील कामे हाती घेण्यासाठी निधी उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत लेखाधिकारी तु.वि.प्रा. तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन निधी उपलब्ध असल्यास प्रशासकीय मान्यता द्यावी असे दिनांक ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले होते.

सदरील विषयी निधीच्या उपलब्धतेबाबत लेखाधिकारी यांना विचारले असता लेखाधिकारी यांनी सध्या प्रशासकीय मान्यता देण्याकरीता रू. ३२५०३.७६ लक्ष मधून मंजूर असलेल्या प्रशासकीय मान्यता किंमत रू. ३१३७०.१० लक्ष वजा जाता रू. ११३३.६६ लक्ष किंमतीस कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल, अशी माहिती दिली. त्यानुसार वरील उर्वरित किंमतीपैकी चार सेवा रस्ते घेणेबाबत चर्चा होवून रू. ४५०.०० लाख किंमतीच्या चार सेवा रस्त्याच्या कामास मान्यता देणेबाबत **ठराव क्र.२१८** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्रमांक ५: सोलापूर धुळे रामा क्र २११ (किमी ३५/०० ते ४२/३६५) रस्त्याची सुधारणा करणे (तुळजापूर सोलापूर भाग १) कामास मुदतवाढ देणे.**

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत सोलापूर धुळे रामा क्र २११ किमी ३५/०० ते ४२/३६५) रस्त्याची सुधारणा करणे (तुळजापूर-सोलापूर भाग-१) रू. २३५३.०० लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात

आली आहे. सदरील कामाची निविदा किंमत रू.१९०६.३६ लाख असून दि.०२/०३/२०१० रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. काम करण्याचा कालावधी १२ महिणे म्हणजेच दिनांक ०१/०३/२०११ पर्यंत होता. दि.२३/०५/२०१२ च्या तुळजापूर विकास प्राधिकरण समितीच्या बैठकीमध्ये सदरील कामास ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत Price escallation आणि DSR difference न देता मुदतवाढ देणे बाबत ठराव क्रमांक १८३ मान्य करण्यात आला आहे. सदर कामासाठी आत्तापर्यंत रू. ९००.०० लाख निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. माहे डिसेंबर २०१२ अखेर रू. ८६३.४६ लाख निधी खर्च झाला असून उर्वरित रू. ३६.५४ लाख निधी संबंधित विभागाकडे अखर्चित आहे.

उर्वरित लांबीमध्ये तुळजापूर शहराला पाणी पुरवठा करणारी नगर पालिका मालकीची जुनी पाणी पुरवठा लाईन रस्त्याच्या दुतर्फा असून त्यामधून शहरातील नागरिकांना अद्यापही पाणी वितरण चालू आहे. त्यामुळे सदरील भागामध्ये रस्ता रूंदीकरण व गटार बांधकाम यासाठी खोदकाम करताना मजुरांना मारहाण व तणावाचे प्रसंग उद्भवत आहेत व याबाबत मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना या अडचणीबाबत वारंवार कल्पना दिलेली आहे. परंतु नवरात्र महोत्सव व दसरा दिवाळी इत्यादी सणामुळे गावाच्या पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून नगर परिषदेने जुन्या पाईप लाईनचा व इतर नलिकांचा पाणी पुरवठा बंद केलेला नाही.

अद्यापही जुन्या पाईप लाईनवरून व इतर पुरक नलिकामधून नागरिकांना पाणी पुरवठा चालू असल्यामुळे सदरील भागातील जल वितरण नलिकांचे स्थलांतर अथवा पाणी पुरवठा खंडीत करणे नगर परिषदेकडून अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून कंत्राटदारास उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी दि.३०/११/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, उस्मानाबाद यांनी विनंती केली आहे. परंतु दि. २३/०५/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत Price escallation आणि DSR difference न देता कामास मुदतवाढ देणे बाबत ठराव क्रमांक १८३ सर्वानुमते मान्य करण्यात आलेला होता. परंतु त्या कालावधीत समाधानकारकपणे काम झाले नाही. मुदतवाढीचे वेळेस तीच-ती कारणे दाखविण्यात येत असून याबाबतची शहानिशा अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ तथा सदस्य तु.वि.प्रा. यांनी करावी वा यावर पुढील बैठकीत विषय निर्णयासाठी ठेवण्यात यावा असे दि. ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले होते.

सदरील विषयी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

**विषय क्र. ६: धार्मिक ग्रंथालय व वस्तूसंग्रहालय बांधणे कामास मुदतवाढ व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत धार्मिक ग्रंथालय व वस्तूसंग्रहालय बांधणे या कामास रू. ४४.३२ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रू.४४.०१ लक्ष असून रू. २१.८२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

सदर काम करत असताना कामामध्ये काही बदल सुचविण्यात आले होते. त्यानुसार सदर पुढील काम करावयाचे असून सदर काम करत असताना निविदेमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी कराव्या लागणार आहेत. त्यानुसार सदर बाबी अतिरिक्त बाबींचा प्रस्ताव, खंड-३८, सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) कठीण खडकात खोदकाम करणे. २) बाहेरील बाजूस फेरो सिमेंट मधील खिडक्या, सज्जा, कमानी व डोम तयार करणे, ३) वॉटर प्रुफ फ्लश डोअर बसविणे. ४) इमारतीच्या बाहेरील बाजूस बंगाली पध्दतीचा गिलावा करणे, ५) इमारतीच्या पोर्चचा छत तयार करण्यासाठी लागणारे स्टेजिंगचे काम.

सदर अतिरिक्त बाबींसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१२-१३ ची जिल्हा दरसूची वापरण्यात आली असून त्याची एकूण किंमत रू. ३८१३९८२/- इतकी येत आहे.

सदर काम करत असताना कामामधील झालेल्या बदलामुळे व अतिरिक्त दर बाबी मंजुरीस लागणाऱ्या कालावधीमुळे कंत्राटदारास मुदतवाढ दि. ३०/०६/२०१३ पर्यंत देणे गरजेचे वाटते मे.सराह कन्सलटन्सी, नाशिक यांनी कळविले आहे.

सदर कामामध्ये झालेले अतिरिक्त परिमाण व अतिरिक्त बाबी यामुळे सदर कामाचा खर्च अंदाजे रू. १०० लक्ष पर्यंत होणे अपेक्षित आहे. सदर विषय हा पूर्णपणे अपूर्ण असून याबाबत सविस्तर कागदपत्रे मा.अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद तथा सदस्य तु.वि.प्रा. यांचेकडे सादर करावेत व त्यांच्या अभिप्रायानंतर बैठकीमध्ये विषय ठेवण्यात यावा असे दि. ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले आहे सुधारित प्रस्ताव मंदिर संस्थानकडून अद्याप प्राप्त झालेला नाही.

सदरील विषय चर्चेस आला असता सदरील काम मूळ मंजूर निविदेप्रमाणे पूर्ण करावे. तरीपण अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून अहवाल सादर करावा व आवश्यक असलेल्या

बाबींचा समावेश करून सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

**विषय क्र. ७: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-१ कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणीपुरवठा योजना भाग-१ कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची अंदाजे किंमत रू. १४०८.२८ लाख

२. निविदा किंमत रू. १२१३.५४ लाख

३. ठेकेदाराचे नावः- मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि.कोल्हापूर

४. कामाचे आदेश दि.१८/०३/२०११

५. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.१७/०३/२०१२ पर्यंत

सदर निविदेची मूळ मुदत पूर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९७ नुसार सदरील योजनेस दि.३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढ न देता मुदतवाढ मंजूर करण्यात आली. ठेकेदार यांनी दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. भाववाढीसह मुदतवाढीची मागणी खालील कारणासाठी केलेली आहे.

१. रस्ता रूंदीकरण करावयाच्या तीन रोडचा ताबा नगर परिषद तुळजापूर न दिल्यामुळे सदर रोडवर पाईप लाईन टाकता आली नाही. याबाबत नगर परिषद तुळजापूरशी पाठपुरावा चालू आहे.
२. जलशुध्दीकरण केंद्रासाठी स्वयंचलीत यंत्रणा बसविण्याचा निर्णय नगर परिषद तुळजापूर कडून न मिळाल्यामुळे यांत्रिकी कामे सुरू करता आली नाहीत.
३. वितरण व्यवस्थेतील घरगुती कनेक्शन जोडण्यासाठी वाढीव मुदतीमध्ये २४४ नळधारकाची यादी प्राप्त झाली आहे. वारंवार पाठपुरावा तुळजापूर नगर परिषदेशी करूनही अद्यापपर्यंत ८०० नळ धारकांची यादी नगर परिषदेकडून प्राप्त झालेली नाही.
४. वेळेवर निधी उपलब्ध नसल्यामुळे कामाची गती मंद आहे.
५. जलदाब चाचणीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही.
६. बोरी धरणामध्ये पुरेसा साठा पावसाळ्यात उपलब्ध झाल्यानंतर तीन महिने यशस्वी चाचणी करण्यासाठी दि. ३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

वरील सर्व अडचणीमुळे कंत्राटदारास विहीत वेळेत काम करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारास कामे पूर्ण करण्यासाठी दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी शिफारस केली आहे.

सदर कामाचे कार्यादेश दि.१७/०३/२०११ रोजी देण्यात आला. परंतु प्रत्यक्षात कामाचे पाईप दि.२१/०६/२०११ रोजी प्राप्त झाले. या कालावधीमध्ये निविदेमध्ये अंतर्भूत असलेले जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याची उंची टाकीची खोदकामे फुटींग इ. कामे ठेकेदारामार्फत करून घेतले आहे. त्यांची रक्कम रू.२३५ लक्ष आहे.

मूळ कालावधीत एकूण रू. ४०६.१० लक्ष किंमतीचे काम पूर्ण झाले आहे. तरी प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे दि.१७/०३/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेबाबत का.अ., म.जी.प्रा. यांनी विनंती केली असता संबंधिताचे पाईपलाईनचे काम संथगतीने चालू असलेबाबत मा.ना.श्री. मधुकररावजी चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. संबंधितास दिनांक ३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढ न देता मुदतवाढ मंजूर करणेबाबत तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये चर्चा होवून ठराव क्र. १९७ सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यापूर्वी भाववाढ न देता मुदतवाढ मंजूर केली असल्याने आता भाववाढीसह मुदतवाढ प्रस्तावित करणे चुकीचे असून ते देणे योग्य होणार नाही.

सदरील विषय चर्चेस आला असता अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

**विषय क्र. ८: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ ची निविदा मे. प्रगती कन्स्ट्रक्शन, चाकूर यांना देण्यात आली होती. सदर कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची अंदाजे किंमत रू. ३१८९.८६ लाख

२. निविदा किंमत रू. १६१४.७६ लाख

३. चालू दरसूची सन २००९-१० नुसार टक्केवारी १.५४ % कमी दराने

४. कामाचे आदेश क्र. १४९ व दि. ०४/०२/२००९

५. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.०३/०२/२०१२ पर्यंत

सदर निविदेची मूळ मुदत पूर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९६ नुसार सदरील योजनेस दि.३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ मंजूर करण्यात आली. उपविभागीयअधिकारी व ठेकेदार यांनी दि.३०/६/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. काम मुदतीत न होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. झोन क्र. ६ साठी आवश्यक असलेली संप व पंपहाऊससाठी जागा नगर परिषद तुळजापूर यांनी दि.०४/०१/२०१३ रोजी उपलब्ध करून दिल्यामुळे विलंब झाला.
२. श्री तुळजाभवानी नवरात्र महोत्सव व दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत यात्रेकरूंच्या गर्दीमुळे काम बंद ठेवावे लागले त्यामुळे विलंब झाला.
३. निविदेव्यतिरिक्त शहरातील शुक्रवार पेठ पाण्याची टाकी ते महाद्वार पर्यंतचे दुतर्फा ११०० मी. स्ट्रॉमवॉटर व युटीलीटी ड्रेनचे काम वाढल्यामुळे विलंब झाला. सद्य:स्थितीत सुध्दा सदर रस्त्याचे रूंदीकरणाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही. त्यामुळे कामास मुदतवाढीची आवश्यकता आहे.
४. झोन क्र. ६ मधील भुयारी गटारीचे पाईपलाईन विकास आराखड्यातील प्रस्तावित रोड प्रमाणे टाकावयाचे असल्याने वारंवार नगर परिषदेस लेखी व तोंडी मागणी करूनसुध्दा अद्यापपर्यंत विकास आराखड्यातील रोडचे डिमार्केशन करून मिळाले नाही. त्यामुळे सदर काम अद्यापपर्यंत करता आले नाही.
५. ठेकेदारास प्राधिकरणाच्या निधी अभावी देयके वेळेवर मिळाले नसल्याने ठेकेदाराने काम संथ गतीने चालू ठेवली आहेत.

उपरोक्त बाबीचा विचार करता ठेकेदारास स्ट्रॉमवॉटर युटीलीटी ड्रेनचे निविदा व्यतिरिक्त काम व रूंदीकरणाचे काम अपूर्ण तसेच उपविभागाने नमूद केलेल्या कारणांचा विचार करता सदर योजनेस ठेकेदाराची विनंती व उपविभागाची शिफारस पाहता काम पूर्ण करण्याच्या उदात्त हेतूने **दि. ३०/०६/२०१३ अखेर पर्यंत** भाववाढीसह मुदतवाढ मंजूर करण्याकरीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे.

संबंधितांचे मुदतीच्या आत झालेल्या कामाची किंमत अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी पाहणी करून अंतिम करून द्यावी व संबंधितास भाववाढीसह ३०/०१/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेबाबत तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये चर्चा होवून ठराव क्र. १९६ सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच म.जी.प्रा.कडून लातूर रस्त्यालगत कृषी खात्याच्या जागेवर संप हाऊस घेण्यासाठी परवानगी न मिळाल्याने काम प्रलंबित राहिल्याचे सांगितले असता मूळ मंजूरीमध्ये कोठे प्रस्तावीत होते अशी विचारणा मा.ना.श्री. मधुकररावजी चव्हाण यांनी केली असता ती समता नगर येथील न.प.च्या मालकीच्या खुल्या जागेत असल्याचे कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांनी सांगितले. त्याठिकाणची जागा मुख्याधिकारी यांनी म.जी.प्रा.च्या ताब्यात विनाविलंब द्यावी व म.जी.प्रा.ने सदरील काम तात्काळ हाती घ्यावे असे सूचित केले.

संबंधित ठेकेदारास प्राधिकरणाच्या निधी अभावी देयके वेळेवर मिळाले नसल्याने ठेकेदाराने काम संथ गतीने चालू ठेवली आहेत असे म.जी.प्रा.कडून सांगण्यात आले असून प्राधिकरणाकडून मागणीप्रमाणे पुरेसा निधी देऊनही असे कारण देणे अत्यंत चुकीचे आहे. याबाबत खुलासा मागविणे योग्य राहील. संबंधितांनी दिलेल्या कारणांची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

**विषय क्र. ९: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-२ कामास मुदतवाढ मिळणेबाबत**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणीपुरवठा योजना भाग-२ कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची निविदा किंमत रू. ७९६.३३ लाख (२३.४७ % जादा)
२. ठेकेदाराचे नावः- मे. मेघा इंजिनियरींग इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. हैद्राबाद
३. कामाचे कार्यारंभ आदेश दि.२५/१०/२०११
४. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.२४/१०/२०१२ पर्यंत
५. कामावरील खर्च रू. ४३९.७० लाख माहे एप्रिल २०१३ अखेर

विषयांकीत कामाची मुदत संपली असून या कामास अद्यापपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली नाही. कामाची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपांगाचे नांव | सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | जोडचर- लांबी ४० मि. | काम २० मी पूर्ण झाले असून पूढील काम प्रगती पथावर आहे. |
| २ | आवक विहीर-व्यास ३.०० मि. | काम १०० टक्के पूर्ण |
| ३ | जोडनलिका-९०० मीमी व्यास डीआय के-९ लांबी-५० मिटर | काम १०० टक्के पूर्ण |
| ४ | तपासणीविहीर-व्यास २.०० मिटर | काम वगळण्यांत आले आहे |
| ५ | उद्‌भव विहीर व पंप हाऊस-व्यास १०.००मि. | उद्‌भव विहीरीच्या पंप हाऊसचे काम लिंटेल बीम व त्यावरील कॉरबेल बीम पर्यंतच्या कॉलम सह पूर्ण झालेले असून उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. |
| ६ | जोडपुल- लांबी ४० मि. | काम १०० टक्के पूर्ण |
| ७ | मातीचा बंधारा- लांबी ५० मिटर | काम वगळण्यांत आले आहे. |
| ८ | रिटेनिंग वॉल | काम वगळण्यांत आले आहे |
| ९ | मिटर रुम व ट्रान्सफार्म प्लॅटफॉर्म | ट्रान्सफार्मर उभारणी व मिटर रुमच्या कामाचे लेआऊट कार्यकारी अभियंता(यां) म.जी.प्रा.ना व ग्रा. मंडळ लातूर यांनी दि.१२.६.२०१२ रोजी मंजूर केलेले आहे. सदर लेआऊटला कार्यकारी अभियंता /इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर, इलेक्ट्रीकल इन्स्पेक्शन डिव्हीजन, उस्मानाबाद यांनी दिनांक १०.८.२०१२ रोजी मंजूरी दिलेली आहे. मिटर रुम व ट्रान्सफार्म प्लॅटफॉर्म चे आरसीसी डिझाईन ॲक्वाडेस स्ट्रक्चरल कंन्सल्टंट नागपूर यांचेकडून घेऊन मार्कआऊट देण्यात आले. मीटर रुम व ट्रान्सफार्मरचे फ्लोअर स्लॅपचे काम पूर्ण तसेच मीटर रुमचे काम लिंटल बीम पर्यंत पूर्ण उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. |
| १० | अशुध्द पाण्याची पंपीग मशिनरी -३०० एचपी ( २+१) | अशुध्द पाण्याचे पंपासाठीचे ७५० केव्हीएचे दोन ट्रान्सफॉर्मर , ईओटी क्रेन , पंपासाठी लागणारे संपूर्ण केबल व वॉल्व्ह पुरवठा करण्यात आलेले आहेत. पंपाचा व मोटरचा पुरवठा १५ जून २०१३ पर्यंत कंत्राटदारामार्फत करण्यात येणार आहे. |
| ११ | अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहीनी व्यास ४५० मीमी, डीआयके-९ लांबी -२८.५० कि.मी | खात्यातर्फे आतापर्यन्त २८.५० कि.मी. लांबीचे पाईप पुरवठा करण्यांत आलेला आहे. अशुध्द उर्ध्ववाहीनीचे २८.५० किमी पैकी २६ किमी लांबीचे खोदकाम व जोडणी पूर्ण करण्यात आलेली आहे तसेच उर्ध्ववाहीनीसाठी लागणारे सर्व वॉल्व्ह पुरवठा करण्यात आलेले असून उर्वरीत संपूर्ण कामे जून २०१३ अखेर पर्यंत पूर्ण होतील. |
| १२ | जोडरस्ता | तुळजापूर नळदूर्ग रा.मा.क्र.१५३ रस्त्यापासून बोरी धरणातील उद्‌भव विहीरी पर्यन्तच्या जोडरस्त्यासाठी लागणा-या जागेचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे दिनांक २३.२.२०१२ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. संबंधीत जमीन मालकाकडून संमती घेवून कामास लवकरच सुरुवात करण्यांत येत आहे. |
| १३ | चौकीदार निवास्थान | वरील प्रमाणे भूसंपादन प्रस्तावानुसार जागा ताब्यात घेऊन लवकरच कामास सुरुवात करण्यात येईल. |
| १४ | कॉफर डॅम (उद्‌भव विहीर, आवक विहीर, तपासणी विहीर, जोड नलिका, जोडचर ) | काम १०० टक्के पूर्ण करण्यांत आले आहे. |
| १५ | योजनेची ३ महिन्यासाठी चाचणी देणे. | जूलै २०१३ मध्ये पंपाची उभारणी करुन ऑगस्ट २०१३ ते ऑक्टोबर २०१३ पर्यंत चाचणी देण्यात येईल. |

**मुदतवाढीसाठी खालील प्रमाणे कारणे आहेत.**

१. मा. अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ लातूर यांनी प्रत्यक्ष साईट भेटीच्या वेळी दिनांक २८/१२/२०११ रोजी उद्‌भवाची जागा बदलली आहे. तसेच निविदा पूर्व बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे कंत्राटदारास दिनांक ०२/०२/२०१२ रोजी उद्‌भवाच्या कामासाठी कॉफरडॅम टाकण्यासाठी मार्क आऊट दिले. त्यामुळे सुरु करण्यास जवळ जवळ ३ महिने विलंब झाला.

२.	४५० मीमी व्यासाची डिआय के-९ पाईपचा पुरवठा खात्यामार्फत दिनांक २२/०२/२०१२ पासून सुरु झाला. त्यानंतर दिनांक १५/०३/२०१२ रोजी उर्ध्ववाहीनीच्या खोदकामाचे मार्क आऊट देण्यात आले त्यामुळे उर्ध्ववाहीनीचे काम सुरु करण्यात ४ महिने विलंब झाला.
३.	जोडरस्ता व चौकीदार निवासस्थानाच्या कामासाठीचा भूसंपादनाच्या प्रस्तावास मंजूरी अप्राप्त असल्याने जागा ताब्यात नाही त्यामुळे अद्यापपर्यंत मार्कआऊट देता आलेले नाही.
४.	जोडपुलाच्या संमातंर ट्रान्सफॉर्मर उभारणी व मिटररुमच्या कामाचे लेआऊट कार्यकारी अभियंता (यां) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ लातूर यांनी दिनांक १२/०६/२०१२ रोजी मंजूर केले. तसेच इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर औरंगाबाद यांनी सदर लेआऊटला माहे ऑगस्ट २०१२ च्या अखेरीस मान्यता दिली. त्यानंतर आरसीसी डिझाईन मागवून घेवून कामाचे मार्कआऊट दिनांक १२/०९/२०१२ रोजी दिले गेले.
५.	कंत्रादाराचे देयके निधीअभावी प्रलंबित राहीली.
तरी संदर्भीय पत्र क्रं १ अन्वये सादर केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावानुसार उपरोक्त निविदेस स्विकृत निविदेतील अटी व शर्तीनुसार दिनांक ३०/१०/२०१३ भाववाढीसह मुदतवाढ मंजुर करण्यात यावी अशी विनंती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी केली आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सांगितले.

**विषय क्र. १०: पापनाश तलावाची खोली वाढविणे व सुशोभिकरण करणे कामांतर्गत पापनाश तलाव व परिसरात खेळणी बसविणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत पापनाश तलाव सुशोभिकरण करणे कामांतर्गत तलावाचे उत्तरेकडील परिसरात खालीलप्रमाणे खेळणी बसविणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | खेळणीचे नाव | नग | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १ | मेरी गो राऊंड | ०१ | १७,०२,५००/- |
| २ | कप सॉसर | ०१ | ३१,२७,५००/- |
| ३ | स्काय ट्रेन (मोनो रेल) | ०१ | ५९,५३,८५३/- |
| एकुण | | | **१,०७,८३,८५३/-** |
| परिसर विकास खर्च २५% | | | २६,९५,९६३/- |
| एकुण | | | १,३४,७९,८१६/- |
| एकुण | | | **१,३५,००,०००/-** |

पापनास तलावाची खोली वाढविणे व सुशोभिकरण करणे कामासाठी एकूण रू. ३२५.०० लाख खर्चास प्राधिकरणाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्या अंतर्गत रू २००.०० लाख व रू. ४.६५ लाख अनुक्रमे बांधकाम, कारंजे बसविणे कामाची निविदा मंजूर केलेली आहे. त्यानुसार बांधकाम प्रगतीपथावर आहे व बांधकामाचा खर्च वाढणार आहे. प्रस्तावित खेळणी बसविणे कामासाठी मान्यता घेणेबाबतची संचिका कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग यांचेकडे सादर केली असता त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.
अ) खेळणीकरीता आवश्यक असणारे दरपत्रके राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देऊन निश्चित करणे संयुक्तीक ठरेल. संबंधित तांत्रिक सल्लागाराकडून सदर कार्यवाही करून घेणे योग्य राहील.
ब) सदर खेळणी उपलब्ध जागेत . परिसरात कशी बसवणार याबाबतचा Layout / plan तयार करणे आवश्यक असून याबाबतची कार्यवाही तांत्रिक सल्लागाराकडून करून घेणे योग्य राहील.
क) खेळणीची दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने आवश्यक असणारे स्थापत्य व विद्युतीकरण कामासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रके तयार करून तीनही प्रकारच्या कामासाठी लागणारा संभाव्य खर्चावरून नवीन प्रशासकीय मान्यता घेणे योग्य होईल. मा.जिल्हाधिकारी महोदयांनी प्रस्तूत प्रकरण तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा घडवून आणण्याचे आदेश दिले आहेत त्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत सरव्यवस्थापक श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे.

सदरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व हा विषय तूर्त स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. ११: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजनेतील घर जोडणी (House Connection) च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर भुयारी गटार योजना भाग-१ चे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भुयारी गटार योजनेच्या मुख्य चेंबरला घरगुती कनेक्शन जोडण्याची जबाबदारी नगर परिषद तुळजापूरची आहे.

त्यामुळे मूळ अंदाजपत्रकामध्ये सदरील बाबींचा समावेश करण्यात आलेला नव्हता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून भुयारी गटार योजनेचे जवळपास ७०% काम पूर्ण झालेले आहे. भुयारी गटार योजनेचे काम चालू असताना किंवा रस्त्याची कामे करण्याअगोदर घरगुती कनेक्शन जोडणे आवश्यक आहे. परंतु नगर परिषकडून तशी कार्यवाही झालेली नाही.

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगर परिषद तुळजापूर यांनी समन्वय साधून सदरील कामाबाबत निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार भुयारी गटार योजनेमधील चेंबरपर्यंत घरगुती जोडणी करण्याबाबत होणारा खर्च जास्त आहे. तुळजापूर नगर परिषदेची आर्थिक क्षमता नसल्यामुळे सदरील काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून करावे असे नगर परिषद तुळजापूर यांनी ठरावाद्वारे कळविले आहे. तसेच नगर परिषदेकडून करावयाचे झाल्यास त्यास कालावधी जास्त लागेल. त्याकरीता भुयारी गटार योजनेची इतर कामे बंद ठेवावी लागतील. परिणामी तुळजापूर शहरातील रस्त्याची कामेही करण्यास विलंब होईल. त्यामुळे तुळजापूर विकास प्राधिकरणामध्ये सदरील कामाची तरतूद करून रू. ३,५६,६०,४००/- (रू. तीन कोटी छपन्न लाख साठ हजार चारशे फक्त)च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे.

हे काम हाती घेणेबाबत नगर परिषदेने दि.०८/०३/२०१३ च्या बैठकीमध्ये ठराव क्र. १७४ मंजूर केला आहे. प्रस्तावित काम हे मंजूर आराखड्यामध्ये व मंजूर अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसल्याने म.जी.प्रा.कडून नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव आल्याने यापूर्वीच्या कामांना निधी उपलब्धतेची खात्री करून मंजुरी देणे प्रलंबित आहे.

सदरील काम हाती घेणेबाबत विषय चर्चेस आला असता सदरील कामाची प्रशासकीय मान्यता किंमत, कामावरील झालेला खर्च, मंजूर अतिरिक्त बाबी व उर्वरित शिल्लक निधी तसेच सदरील काम मंजूर निधीपेक्षा जास्तीचा आहे किंवा मूळ मंजूर किंमतीमध्ये समाविष्ट आहे या सर्व बाबींचा सविस्तर प्रस्ताव म.जी.प्रा.ने तपासून सादर करावा, तोपर्यंत सदरील कामास मूळ प्रशासकीय किंमतीच्या अधीन राहून तत्वतः मान्य केले.

**विषय क्र. १२: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ मधून वगळलेल्या भागासाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर भुयारी गटार योजनेस दि. १७/०३/२०१० रोजी रू. ३१.८९ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मूळ मंजूर योजनेमध्ये तुळजापूर शहराकरीता एकूण ६ झोन प्रस्तावित करण्यात आले आहेत. सदरील योजनेमध्ये शहरातील मोतीझरा व तुळजापूर खुर्दचा भाग खोलगट असल्यामुळे मंजूर योजनेमध्ये तो भाग समाविष्ट करण्यात आला नव्हता. तथापि तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२५/०२/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. त्यामध्ये सदरील खोलगट भागाकरीता भुयारी गटार योजना राबविणेबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार मोतीझरा व तुळजापूर खूर्द या भागाचे सर्वेक्षण करून अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यात आलेले आहेत. सदरील अंदाजपत्रकामध्ये खालील उपांगाचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| १. भुयारी गटार पाईप लाईन ८५०० मी. | रू. ३,३२,२९,१००/- |
| २. संप व पंपहाऊस (मोतीझरा) क्षमता ७५००० लि. | रू. ११,३२,०००/- |
| ३. संप व पंपहाऊस (तुळजापूर खूद) क्षमता ८०,००० लि. | रू. १०,५३,१००/- |
| ४. पंपींग मशीनरी मोतीझरा (२ एच.पी. ४ नग) | रू. २८,१८,९००/- |
| ५. पंपींग मशीनरी तुळजापूर खुर्द (२ एच.पी. ४ नग) | रू. २८,१८,९००/- |
| ६. पंपींग मेन मोतीझरा लांबी ११०० मी. | रू. १८,२४,३००/- |
| ७. पंपींग मेन तुळजापूर खुर्द लांबी २००० मी. | रू. २९,६४,४००/- |
| ८. वीज कनेक्शन | रू. १५,००,०००/- |
| **एकूण** | **रू. ४,७३,४१,०००/-** |

तुळजापूर विकास प्राधिकरणामधून रू. ४,७३,४१,०००/- (रू. चार कोटी त्र्याहत्तर लाख एक्केचाळीस हजार चारशे फक्त) च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे.

सदरील विषयाबाबत चर्चा करण्यात आली व हा विषय तूर्त स्थगीत ठेवण्यात यावा व टप्पा-२ मध्ये हाती घेण्यात यावा असे ठरले.

**विषय क्र. १३: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत बार्शी तुळजापूर रस्ता (किमी ४२/४०० ते ४८/८००) कामाच्या निविदेस मंजुरी देणेबाबत.**

प्रस्तूत कामास रू. ४४.५० लाख इतक्या किंमतीस सन २०१२-१३ च्या दरसूचीवर मंडळ कार्यालयाचे तांत्रिक मान्यता आदेश जा.क्र. तांशा/उस्मा/रस्ते/३७ सन २०१२-१३ दि.२७/१२/१२ अन्वये प्राप्त आहे. सदर कामास प्र.मा.किंमत. रू.३५०.०० लाख इतकी आहे. आतापर्यंत या कामावर झालेला खर्च रू.२१२.२९ लाख इतका आहे. उर्वरित रक्कम रू.१३७.७१ लाख इतकी आहे. या शिल्लक रकमेतून विषयांकीत काम करण्यात येत आहे.

सदर कामास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी पत्र क्र. निविदा/ ४१ दिनांक २१/०१/२०१३ रू.४४,४९,७४८/- इतक्या रकमेच्या प्रारूप निविदेस मंजूरी दिली आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने आहे. सदर प्रारूप निविदेचे दर हे दरसूची सन २०१२-१३ च्या दरसूचीवर आधारीत आहेत. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व निविदेप्रमाणे कामाचा आवाका पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाव | प्रशासकीय मान्यतेप्रमाणे | तांत्रिक मान्यते प्रमाणे आवाका | निविदा प्रमाणे आवाका |
|---|---|---|---|---|
| १ | रस्त्याचे काम | रू. ३५० लाख | रू. ४४.५० लाख | रू.४४,४९,७४८/- |
| | एकुण | रू. ३५० लाख | रू. ४४.५० लाख | रू. ४४,४९,७४८/- |

या कार्यालयाने ई-निविदा सूचना क्र. १० सन २०१२-१३ पत्र क्रमांक निविदा / ६१६ दिनांक ०२/०२/२०१३ अन्वये प्रसिध्दीस्तव माहिती कार्यालय, जाहिरात व्यवस्थापक, लातूर यांना पाठविली. जाहिरात खालील वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | प्रसिध्दीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | दै.लोकमत, लातूर | ०६/०२/२०१३ |
| २ | दै. उज्वलकाळ, उस्मानाबाद | ०७/०२/२०१३ |
| ३ | सा.युगप्रवर्तक, उस्मानाबाद | ११/०२/२०१३ |

कामाची जाहीर प्रसिध्दी सा.बां. खात्याचे वेबसाईटवर दिनांक ०४/०२/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा प्रणाली अंतर्गत http://maharashtra.etenders.in या संकेत स्थळावरील http://pwd.maharashtra.etenders.in या सबपोर्टलवर ई-निविदा प्रणाली अनुसार ई-निविदा क्रमांक १५८९ नुसार प्रसिध्द करण्यात आली. त्या अनुषंगाने निविदेचे वेळापत्रक ठेवण्यात आले होते. त्यानंतर दिनांक १८/०२/२०१३ रोजी निविदा प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक (शुध्दीपत्रक) खालीलप्रमाणे काढण्यात आले.

| अ. क्र. | कार्यालयासाठी प्रक्रिया | कंत्राटदारासाठी प्रक्रिया | पासून | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| १. | Tender release | - | २/२/१३ | ११.०० | ६/२/१३ | १७.३० |
| २. | - | निविदा डाऊनलोड करणे | ६/२/१३ | १७.३१ | २५/२/१३ | १७.३० |
| ३. | | निविदा सादर करणे | ७/२/१३ | १७.३१ | २७/२/१३ | १४.०० |
| ४. | superhash व Bid Lock | - | २७/२/१३ | १४.०१ | २७/२/१३ | १७.३० |
| ५. | - | Control Transfer of bid | २७/२/१३ | १७.३१ | २८/२/१३ | १७.३० |
| ६. | लिफाफा क्र. १ उघडण्याचा कालावधी | - | २८/२/१३ | १७.३१ | ४/३/१३ | १७.३० |
| ७. | लिफाफा क्र. २ उघडण्याचा कालावधी | - | २८/२/१३ | १७.३१ | ६/३/१३ | १७.३० |
| ८ | निविदा स्विकृती | - | ६/३/१३ | १७.३१ | १६/३/१३ | १७.३० |

. निविदा क्रमांक १ (Technical Envelope) दिनांक ०४/०३/२०१३ रोजी या कार्यालयात ऑनलाईन उघडण्यात आला असता निविदा सूचनेस प्रतिसाद म्हणून भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी या कंत्राटदाराने त्यांची निविदा दाखल (uplod) केली. निविदेतील अटी व पात्रतेच्या कसोट्याप्रमाणे कंत्राटदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता छाननीमध्ये भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी हा कंत्राटदार पात्र ठरला. पात्र कंत्राटदाराचे पाकीट क्र. २ दि. ०७/०३/२०१३ रोजी या कार्यालयात ऑनलाईन उघडले असता कंत्राटदारांनी नोंदविलेला देकार खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | निविदा किंमत रू. | देकार | देकारानुसार येणारी रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी | ४४,४९,७४८ | १०.५५ % ज्यादा | ४९,१९,१९६ |

त्या अनुषंगाने भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी यांना दर कमी करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि. ०८/०३/२०१३ च्या पत्रान्वये १०.५५ टक्के ऐवजी ४.९० टक्के जादा दराचा सुधारीत देकार दिला होता. त्यानंतर मुख्य अभियंता यांनी दि.१९/०३/२०१३ च्या पत्रान्वये त्यांना दर कमी करणेबाबत विचारणा केली असता दि.१९/०३/२०१३ च्या

पत्रान्वये ४.४१ टक्के अधिक असा सुधारीत देकार दिला आहे. मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी दि.२०/३/२०१३ अन्वये व अधीक्षक अभियंता यांनी दि.२५/०३/२०१३ अन्वये सदर निविदेस मंजुरी दिली आहे.

सदरील कामाबाबत सविस्तर चर्चा होवून हे काम ठेकेदाराने अंदाजपत्रकीय दराने करावे या अटीवर निविदेस मान्यता देणेबाबत **ठराव क्र. २१९** मान्य करण्यात आला.

**विषय क्रमांक १४: आयत्या वेळचे विषय:**

**१. मंदिर संस्थानकडील कामांना मुदतवाढ देणेबाबत.**

दि. २६/०४/२०१३ रोजी मंदिर संस्थानच्या बैठकीमध्ये खालील कामांना मुदतवाढ देण्याबाबत ठराव क्र. ७ मंजुर करण्यात आला.

१) मंदिराशेजारी भक्तनिवास व शॉपींग सेंटर बांधणे:-हे काम पूर्ण करण्यासाठी दि. ३० जून २०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देण्याचे ठरले.

२) आराधवाडी येथे वाहनतळ विकसीत करणे:- हे काम पूर्ण करण्यासाठी दि. ३० जून २०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देण्याचे ठरले.

३) घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्तनिवास बांधणे:- हे काम पूर्ण करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देण्याचे ठरले.

४) बीडकर तलाव ते दर्शनमंडप पायऱ्या बांधणे:- हे काम पूर्ण करण्यासाठी दि. ३१ मे २०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देण्याचे ठरले.

५) पापनाश तलाव खोली वाढविणे व सुशोभिकरण करणे:- हे काम पूर्ण करण्यासाठी दि. ३० जून २०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देण्याचे ठरले.

वरीलप्रमाणे मंदिर संस्थान समितीच्या बैठकीमध्ये उपरोक्त ५ कामांना मुदतवाढ मंजूर करण्यात आल्याने त्याप्रमाणेच प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मुदतवाढ देणेबाबतचा **ठराव क्र. २२०** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**२. तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत प्रशासकीय सल्लागार पद भरणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत सध्या मोठ्या प्रमाणात कामे प्रगतीपथावर असून अद्याप काही कामे सुरू करावयाची आहेत. सदरील कामावर विविध यंत्रणा, सल्लागार, प्राधिकरणाकडून नियुक्त शाखा अभियंता, उपअभियंता या सर्वांवर सनियंत्रण तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांचा वेळोवेळी आढावा घेणेकरीता, कामाची स्थळ पाहणी करणेकरीता प्राधिकरणाकडे स्वतंत्र उच्च पदस्थ अधिकारी उपलब्ध नाहीत. तसेच प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहरातील रस्ते रूंदीकरण व विकास, वाहनतळ विकसीत करणे इ. कामांसाठी जागा भूसंपादनाची प्रक्रियाही प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे. तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामांच्या प्रशासकीय बाबी व भूसंपादनाचे कामकाज पाहण्यासाठी सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची आवश्यकता असून प्राधिकरणावर सदरील पदाची नेमणूक करणेबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी विषयाधीन प्रस्ताव मांडला असता याबाबत सविस्तर चर्चा होवून तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामांच्या प्रशासकीय बाबी व भूसंपादनाचे कामकाज पाहण्यासाठी सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत **ठराव क्र. २२१** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी आभार व्यक्त करून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.प्रा.यांचे स्वाक्षरीत**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तुळजापूर विकास प्राधिकरण
उस्मानाबाद करीता

## क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम, तुळजापूर विकास प्राधिकरण, दिनांक ०५/०७/२०१३ बैठक इतिवृत्त

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत व खालील विषयावर चर्चा करणे करिता, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१३ रोजी, सकाळी ११:०० वा. सर्कीट हाऊस, तुळजापूर येथे संपन्न झाली. सदर बैठकीस सन्माननीय सदस्य व तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत संबंधित कार्यान्वयीन अधिकारी उपस्थित होते.

**विषय क्र. १:- दिनांक २३/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २३/०५/२०१३ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ, उचित कार्यवाहीसाठी आणि अनुपालनास्तव, सर्व सन्माननीय सदस्य आणि कार्यान्वयीन यंत्रणांना पाठविण्यात आलेले आहेत, तरी इतिवृत्तास मान्यता दयावी अशी विनंती सदस्य सचिव, तु.वि.प्रा. यांनी सभागृहास केली असता त्यावर चर्चा होवून इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. २:- तुळजापूर शहरातंर्गत ३० मुख्य रस्त्याच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर शहरातील विविध २७ मुख्य अंतर्गत रस्त्यांच्या कामांचे एकुण रू. २५०२.२२ लक्ष किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले होते. त्यानंतर त्यांनी दि.०८/१०/२०१२ रोजी बैठकीमध्ये ३० रस्त्यांसाठी रू.२५७४.०० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विनंती केली होती. सदरील कामे हाती घेण्यासाठी निधी उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत लेखाधिकारी तु.वि.प्रा. तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन निधी उपलब्ध असल्यास प्रशासकीय मान्यता द्यावी असे दिनांक ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले होते.

सदरील विषयी दि. २३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये निधीच्या उपलब्धतेबाबत विचारले असता लेखाधिकारी यांनी सध्या प्रशासकीय मान्यता देण्याकरीता रू. ३२५०३.७६ लक्ष मधून मंजूर असलेल्या प्रशासकीय मान्यता किंमत रू. ३१३७०.१० लक्ष वजा जाता रू. ११३३.६६ लक्ष किंमतीस कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल, अशी माहिती दिली होती. त्यानुसार रू. ४५०.०० लाख किंमतीच्या चार सेवा रस्त्याच्या कामास मान्यता देणेबाबत ठराव क्र.२१८ मान्य करण्यात आला. त्यानंतर रू. ४५० लाख वजा जाता रू. ६८३.६६ लाख किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देता येईल. त्यामुळे प्राधान्यक्रमाने रस्त्याची निवड करून प्रस्ताव तयार करावा, तसेच मंदिर परिसरातील रस्त्यांना प्राधान्य द्यावे व सविस्तर प्रस्ताव तयार करून पुढील बैठकीत ठेवण्यात यावा, असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले होते.

सदरील विषय चर्चेस आला असता नगर परिषदेने ३० रस्त्यांची यादी सादर केली, पण ढोबळ अंदाजपत्रकीय किंमत यादीमध्ये समाविष्ट नव्हती. तरी मा.अध्यक्ष महोदयांशी चर्चा करून एक आठवड्यात नगर परिषदेने ढोबळ अंदाजपत्रकीय किंमतींसह यादी रस्त्यांची सादर करावी व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.

**विषय क्र. ३: सोलापूर धुळे रामा क्र २११ (किमी ३५/०० ते ४२/३६५) रस्त्याची सुधारणा करणे (तुळजापूर सोलापूर भाग १) कामास मुदतवाढ देणे.**

तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत सोलापूर धुळे रामा क्र २११ किमी ३५/०० ते ४२/३६५) रस्त्याची सुधारणा करणे (तुळजापूर-सोलापूर भाग-१) रू. २३५३.०० लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरील कामाची निविदा किंमत रू.१९०६.३६ लाख असून दि.०२/०३/२०१० रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. काम करण्याचा कालावधी १२ महिणे म्हणजेच दिनांक ०१/०३/२०११ पर्यंत होता. दि.२३/०५/२०१२ च्या तुळजापूर विकास प्राधिकरण समितीच्या बैठकीमध्ये सदरील कामास ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत Price escallation आणि DSR difference न देता मुदतवाढ देणे बाबत ठराव क्रमांक १८३ मान्य करण्यात आला आहे. सदर कामासाठी आत्तापर्यंत रू. ९००.०० लाख निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. माहे डिसेंबर २०१२ अखेर रू. ८६३.४६ लाख निधी खर्च झाला असून उर्वरित रू. ३६.५४ लाख निधी संबंधित विभागाकडे अखर्चित आहे.

उर्वरित लांबीमध्ये तुळजापूर शहराला पाणी पुरवठा करणारी नगर पालिका मालकीची जुनी पाणी पुरवठा लाईन रस्त्याच्या दुतर्फा असून त्यामधून शहरातील नागरिकांना अद्यापही पाणी वितरण चालू आहे. त्यामुळे सदरील भागामध्ये रस्ता रूंदीकरण व गटार बांधकाम यासाठी खोदकाम करताना मजुरांना मारहाण व तणावाचे प्रसंग उद्भवत आहेत व याबाबत मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांना या अडचणीबाबत वारंवार कल्पना दिलेली आहे. परंतु नवरात्र महोत्सव व दसरा दिवाळी इत्यादी सणामुळे गावाच्या पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय येऊ नये म्हणून नगर परिषदेने जुन्या पाईप लाईनचा व इतर नलिकांचा पाणी पुरवठा बंद केलेला नाही. अद्यापही जुन्या पाईप लाईनवरून व इतर पुरक

नलिकामधून नागरिकांना पाणी पुरवठा चालू असल्यामुळे सदरील भागातील जल वितरण नलिकांचे स्थलांतर अथवा पाणी पुरवठा खंडीत करणे नगर परिषदेकडून अपेक्षित आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून कंत्राटदारास उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी दि.३०/११/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, उस्मानाबाद यांनी विनंती केली आहे. परंतु दि. २३/०५/२०१२ रोजीच्या बैठकीमध्ये ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत Price escallation आणि DSR difference न देता कामास मुदतवाढ देणे बाबत ठराव क्रमांक १८३ सर्वानुमते मान्य करण्यात आलेला होता. परंतु त्या कालावधीत समाधानकारकपणे काम झाले नाही. सदरील विषयी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि.२३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये सूचीत केले होते.

त्यानुसार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये शिवाजी चौक ते बीएसएनएल ऑफीस पर्यंतच्या भागासाठी ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणे योग्य वाटते. उर्वरित कामासाठी व डिसेंबर २०१२ पुढील कालावधीसाठी भाववाढ देणे संयुक्तीक वाटत नाही असे नमूद केले आहे. यावर सविस्तर चर्चा होवून शिवाजी चौक ते बीएसएनएल ऑफीस पर्यंतच्या भागासाठी ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत तसेच उर्वरित कामासाठी ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२२** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ४: धार्मिक ग्रंथालय व वस्तूसंग्रहालय बांधणे कामास मुदतवाढ व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत धार्मिक ग्रंथालय व वस्तूसंग्रहालय बांधणे या कामास रू. ४४.३२ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामाची निविदा किंमत रू.४४.०१ लक्ष असून रू. ४१.५४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

सदर काम करत असताना कामामध्ये काही बदल सुचविण्यात आले होते. त्यानुसार सदर पुढील काम करावयाचे असून सदर काम करत असताना निविदेमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी कराव्या लागणार आहेत. त्यानुसार सदर बाबी अतिरिक्त बाबींचा प्रस्ताव, खंड-३८, सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) कठीण खडकात खोदकाम करणे. २) बाहेरील बाजूस फेरो सिमेंट मधील खिडक्या, सज्जा, कमानी व डोम तयार करणे, ३) वॉटर प्रुफ फ्लश डोअर बसविणे. ४) इमारतीच्या बाहेरील बाजूस बंगाली पध्दतीचा गिलावा करणे, ५) इमारतीच्या पोर्चचा छत तयार करण्यासाठी लागणारे स्टेजिंगचे काम.

सदर अतिरिक्त बाबींसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१२-१३ ची जिल्हा दरसूची वापरण्यात आली असून त्याची एकूण किंमत रू. ३८१३९८२/- इतकी येत आहे. सदर काम करत असताना कामामधील झालेल्या बदलामुळे व अतिरिक्त दर बाबी मंजुरीस लागणाऱ्या कालावधीमुळे कंत्राटदारास मुदतवाढ दि. ३०/०६/२०१३ पर्यंत देणे गरजेचे वाटते मे.सराह कन्सलटन्सी, नाशिक यांनी कळविले होते.

सदर कामामध्ये झालेले अतिरिक्त परिमाण व अतिरिक्त बाबी यामुळे सदर कामाचा खर्च अंदाजे रू. १०० लक्ष पर्यंत होणे अपेक्षित आहे. सदर विषय हा पूर्णपणे अपूर्ण असून याबाबत सविस्तर कागदपत्रे मा.अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद तथा सदस्य तु.वि.प्रा. यांचेकडे सादर करावेत व त्यांच्या अभिप्रायानंतर बैठकीमध्ये विषय ठेवण्यात यावा असे दि. ०८/०२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठरले आहे. सुधारित प्रस्ताव मंदिर संस्थानकडून अद्याप प्राप्त झालेला नाही.

दि. २३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये सदरील काम मूळ मंजूर निविदेप्रमाणे पूर्ण करावे. तरीपण अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून अहवाल सादर करावा व आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश करून सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचित केले होते.

सदरील विषयावर सविस्तर चर्चा होवून सदरील काम मूळ मंजूर निविदेप्रमाणे पूर्ण करावे व या कामास दि. ३०/०६/२०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२३** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ५ :- तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामकाजासाठी प्रशासकीय सल्लागार नेमणेबाबत**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत सध्या मोठ्या प्रमाणात कामे प्रगतीपथावर असून अद्याप काही कामे सुरू करावयाची आहेत. सदरील कामावर विविध यंत्रणा, सल्लागार, प्राधिकरणाकडून नियुक्त शाखा अभियंता, उपअभियंता या सर्वांवर सनियंत्रण तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांचा वेळोवेळी आढावा घेणेकरीता, कामाची स्थळ पाहणी करणेकरीता प्राधिकरणाकडे स्वतंत्र उच्च पदस्थ अधिकारी उपलब्ध नाहीत. तसेच प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहरातील

रस्ते रूंदीकरण व विकास, वाहनतळ विकसीत करणे इ. कामांसाठी जागा भूसंपादनाची प्रक्रियाही प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे. तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामांच्या प्रशासकीय बाबी व भूसंपादनाचे कामकाज पाहण्यासाठी सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची आवश्यकता असून प्राधिकरणावर सदरील पदाची नेमणूक करणेबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी विषयाधीन प्रस्ताव मांडला असता याबाबत सविस्तर चर्चा होवून तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामांच्या प्रशासकीय बाबी व भूसंपादनाचे कामकाज पाहण्यासाठी सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत दि. २३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. २२१ मान्य करण्यात आला आहे.

उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेप्रमाणे तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कामांच्या प्रशासकीय बाबी व भूसंपादनाचे कामकाज पाहण्यासाठी सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत दिनांक ०८ जून २०१३ रोजी दै. पुण्यनगरी, औरंगाबाद आवृत्तीमध्ये जाहिरात देण्यात आली होती. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.१७/०६/२०१३ पर्यंत दोन अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले होते. दि. २७/०६/२०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद येथे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.प्रा, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.तथा सदस्य तु.वि.प्रा., मा.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, तथा सदस्य तु.वि.प्रा. यांनी सदरील पदाची मुलाखत घेतली. सदरील मुलाखतीमध्ये सहभागी उमेदवारांना खालीलप्रमाणे गुण प्राप्त आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पत्ता | एकूण प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | श्री ज्ञानोबा गणपतराव फुलारी | मु.पो. होळी, ता.उदगीर, जि.लातूर | १८ |
| २ | श्री भिमाशंकर शिवरूद्रप्पा भडंगे | जुन्या टिव्ही सेंटरजवळ, उस्मानाबाद | १४ |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता श्री ज्ञानोबा गणपतराव फुलारी यांना सर्वाधिक एकूण १८ गुण प्राप्त असल्याने श्री ज्ञानोबा गणपतराव फुलारी (सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी) यांना प्रशासकीय सल्लागार पदावर घेण्यासाठी सविस्तर चर्चा होवून नियुक्ती देणेबाबत **ठराव क्र. २२४** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ६: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-१ कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणीपुरवठा योजना भाग-१ कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची अंदाजे किंमत रू. १४०८.२८ लाख
२. निविदा किंमत रू. १२१३.५४ लाख
३. ठेकेदाराचे नावः- मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि.कोल्हापूर
४. कामाचे आदेश दि.१८/०३/२०११
५. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.१७/०३/२०१२ पर्यंत

सदर निविदेची मूळ मुदत पूर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९७ नुसार सदरील योजनेस दि.३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढ न देता मुदतवाढ मंजूर करण्यात आली. ठेकेदार यांनी दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. भाववाढीसह मुदतवाढीची मागणी खालील कारणासाठी केलेली आहे.

१. रस्ता रूंदीकरण करावयाच्या तीन रोडचा ताबा नगर परिषद तुळजापूर न दिल्यामुळे सदर रोडवर पाईप लाईन टाकता आली नाही. याबाबत नगर परिषद तुळजापूरशी पाठपुरावा चालू आहे.
२. जलशुध्दीकरण केंद्रासाठी स्वयंचलीत यंत्रणा बसविण्याचा निर्णय नगर परिषद तुळजापूर कडून न मिळाल्यामुळे यांत्रिकी कामे सुरू करता आली नाहीत.
३. वितरण व्यवस्थेतील घरगुती कनेक्शन जोडण्यासाठी वाढीव मुदतीमध्ये २४४ नळधारकाची यादी प्राप्त झाली आहे. वारंवार पाठपुरावा तुळजापूर नगर परिषदेशी करूनही अद्यापपर्यंत ८०० नळ धारकांची यादी नगर परिषदेकडून प्राप्त झालेली नाही.
४. वेळेवर निधी उपलब्ध नसल्यामुळे कामाची गती मंद आहे.
५. जलदाब चाचणीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही.

६. बोरी धरणामध्ये पुरेसा साठा पावसाळ्यात उपलब्ध झाल्यानंतर तीन महिने यशस्वी चाचणी करण्यासाठी दि. ३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

वरील सर्व अडचणीमुळे कंत्राटदारास विहीत वेळेत काम करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारास कामे पूर्ण करण्यासाठी दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी शिफारस केली आहे.

सदर कामाचे कार्यादेश दि.१७/०३/२०११ रोजी देण्यात आला. परंतु प्रत्यक्षात कामाचे पाईप दि.२१/०६/२०११ रोजी प्राप्त झाले. या कालावधीमध्ये निविदेमध्ये अंतर्भूत असलेले जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याची उंची टाकीची खोदकामे फुटींग इ. कामे ठेकेदारामार्फत करून घेतले आहे. त्यांची रक्कम रू.२३५ लक्ष आहे.

मूळ कालावधीत एकूण रू. ४०६.१० लक्ष किंमतीचे काम पूर्ण झाले आहे. तरी प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे दि.१७/०३/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेबाबत का.अ., म.जी.प्रा. यांनी विनंती केली असता संबंधिताचे पाईपलाईनचे काम संथगतीने चालू असलेबाबत मा.ना.श्री. मधुकररावजी चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. संबंधितास दिनांक ३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढ न देता मुदतवाढ मंजूर करणेबाबत तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९७ सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. २३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये सूचित केले होते. त्याप्रमाणे अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ, उस्मानाबाद यांनी कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या १ ते ७ कारणांचा विचार करून व स्विकृत निविदेमध्ये भाववाढ कलमाचा अंतर्भाव नसल्यामुळे, भाववाढ देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नगर पालिका तुळजापूर यांचेकडून अद्यापपर्यंत सर्व घरगुती नळ धारकांची यादी उपलब्ध करून देण्यात आली नाही. तसेच जलदाब चाचणीसाठी पुरेशा पाण्याची अनुपलब्धता पाहता उक्त कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणे योग्य होईल असे अभिप्रायामध्ये नमूद केले.

सदरील विषयावर सविस्तर चर्चा होवून तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-१ या कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२५** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ७: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-२ कामास मुदतवाढ मिळणेबाबत**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर पाणीपुरवठा योजना भाग-२ कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची निविदा किंमत — रू. ७९६.३३ लाख (२३.४७ % जादा)
२. ठेकेदाराचे नावः- — मे. मेघा इंजिनियरींग इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. हैद्राबाद
३. कामाचे कार्यारंभ आदेश — दि.२५/१०/२०११
४. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.२४/१०/२०१२ पर्यंत
५. कामावरील खर्च — रू. ४३९.७० लाख माहे एप्रिल २०१३ अखेर

**मुदतवाढीची कारणे खालील प्रमाणे आहेत.**

१. मा. अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ लातूर यांनी प्रत्यक्ष साईट भेटीच्या वेळी दिनांक २८/१२/२०११ रोजी उद्‌भवाची जागा बदलली आहे. तसेच निविदा पूर्व बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे कंत्राटदारास दिनांक ०२/०२/२०१२ रोजी उद्‌भवाच्या कामासाठी कॉफरडॅम टाकण्यासाठी मार्क आऊट दिले. त्यामुळे कामे सुरु करण्यास जवळ जवळ ३ महिने विलंब झाला.
२. ४५० मीमी व्यासाची डिआय के-९ पाईपचा पुरवठा खात्यामार्फत दिनांक २२/०२/२०१२ पासून सुरु झाला. त्यानंतर दिनांक १५/०३/२०१२ रोजी उर्ध्ववाहीनीच्या खोदकामाचे मार्क आऊट देण्यात आले त्यामुळे उर्ध्ववाहीनीचे काम सुरु करण्यात ४ महिने विलंब झाला.
३. जोडरस्ता व चौकीदार निवासस्थानाच्या कामासाठीचा भूसंपादनाच्या प्रस्तावास मंजूरी अप्राप्त असल्याने जागा ताब्यात नाही त्यामुळे अद्यापपर्यंत मार्कआऊट देता आलेले नाही.
४. जोडपुलाच्या समांतर ट्रान्सफॉर्मर उभारणी व मिटररुमच्या कामाचे लेआऊट कार्यकारी अभियंता (यां) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ लातूर यांनी दिनांक १२/०६/२०१२ रोजी मंजूर केले. तसेच इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर औरंगाबाद यांनी सदर लेआऊटला माहे ऑगस्ट २०१२ च्या अखेरीस मान्यता दिली. त्यानंतर आरसीसी डिझाईन मागवून कामाचे मार्कआऊट दिनांक १२/०९/२०१२ रोजी दिले गेले.
५. कंत्रादाराचे देयके निधीअभावी प्रलंबित राहीली.

तरी दिनांक ३०/१०/२०१३ भाववाढीसह मुदतवाढ मंजुर करण्यात यावी अशी विनंती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी केली होती. त्यानुसार अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. २३/०५/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचित केले होते. त्याप्रमाणे अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ, उस्मानाबाद यांनी कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या १ ते ४ कारणांसाठी उर्वरित काम पूर्ण करण्यास दि.३१/०८/२०१३ पर्यंत भाववाढीसह व इतर कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ मंजुरी देणे योग्य होईल असे अभिप्रायामध्ये नमूद केले.

सदरील विषयावर सविस्तर चर्चा होवून तुळजापूर शहर पाणी पुरवठा योजना भाग-२ या कामास कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या १ ते ४ कारणांसाठी उर्वरित काम पूर्ण करण्यास दि.३१/०८/२०१३ पर्यंत भाववाढीसह व इतर कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२६** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ८: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ ची निविदा मे. प्रगती कन्स्ट्रक्शन, चाकूर यांना देण्यात आली होती. सदर कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची अंदाजे किंमत रू. ३१८९.८६ लाख

२. निविदा किंमत रू. १६१४.७६ लाख

३. चालू दरसूची सन २००९-१० नुसार टक्केवारी १.५४ % कमी दराने

४. कामाचे आदेश क्र. १४९ व दि. ०४/०२/२००९

५. कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.०३/०२/२०१२ पर्यंत

सदर निविदेची मूळ मुदत पूर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९६ नुसार सदरील योजनेस दि.३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ मंजूर करण्यात आली. उपविभागीयअधिकारी व ठेकेदार यांनी दि.३०/६/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ देणेबाबत विनंती केली आहे. काम मुदतीत न होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. झोन क्र. ६ साठी आवश्यक असलेली संप व पंपहाऊससाठी जागा नगर परिषद तुळजापूर यांनी दि.०४/०१/२०१३ रोजी उपलब्ध करून दिल्यामुळे विलंब झाला.
२. श्री तुळजाभवानी नवरात्र महोत्सव व दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत यात्रेकरूंच्या गर्दीमुळे काम बंद ठेवावे लागले त्यामुळे विलंब झाला.
३. निविदेव्यतिरिक्त शहरातील शुक्रवार पेठ पाण्याची टाकी ते महाद्वार पर्यंतचे दुतर्फा ११०० मी. स्ट्रॉमवॉटर व युटीलीटी ड्रेनचे काम वाढल्यामुळे विलंब झाला. सद्यःस्थितीत सुध्दा सदर रस्त्याचे रूंदीकरणाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही. त्यामुळे कामास मुदतवाढीची आवश्यकता आहे.
४. झोन क्र. ६ मधील भुयारी गटारीचे पाईपलाईन विकास आराखड्यातील प्रस्तावित रोड प्रमाणे टाकावयाचे असल्याने वारंवार नगर परिषदेस लेखी व तोंडी मागणी करूनसुध्दा अद्यापपर्यंत विकास आराखड्यातील रोडचे डिमार्केशन करून मिळाले नाही. त्यामुळे सदर काम अद्यापपर्यंत करता आले नाही.
५. ठेकेदारास प्राधिकरणाच्या निधी अभावी देयके वेळेवर मिळाले नसल्याने ठेकेदाराने काम संथ गतीने चालू ठेवली आहेत.

उपरोक्त बाबीचा विचार करता ठेकेदारास स्ट्रॉमवॉटर युटीलीटी ड्रेनचे निविदा व्यतिरिक्त काम व रूंदीकरणाचे काम अपूर्ण तसेच उपविभागाने नमूद केलेल्या कारणांचा विचार करता सदर योजनेस ठेकेदाराची विनंती व उपविभागाची शिफारस पाहता काम पूर्ण करण्याच्या उदात्त हेतूने दि. ३०/०६/२०१३ अखेर पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ मंजूर करण्याकरीता कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली होती.

संबंधितांचे मुदतीच्या आत झालेल्या कामाची किंमत अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी पाहणी करून अंतिम करून द्यावी व संबंधितास भाववाढीसह ३०/०१/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणेबाबत तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९६ सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी कामाची पाहणी करून मुदतवाढीबाबत अहवाल सादर करावा व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. २३/०५/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचित केले होते. त्याप्रमाणे अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ, उस्मानाबाद यांनी कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या १ ते ५ कारणांचा विचार करून व स्विकृत निविदेमध्ये भाववाढ

कलमाचा अंतर्भाव नसल्यामुळे, भाववाढ देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. उर्वरि कामे पूर्ण करण्यासाठी यंत्रणेकडून त्यांचे दि. २२/०५/२०१३ च्या पत्रानुसार मागणी केल्याने दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ देणे योग्य होईल असे अभिप्रायामध्ये नमूद केले.

सदरील विषयावर सविस्तर चर्चा होवून भुयारी गटार योजना भाग-१ या कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२७** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र.९:- तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजना भाग-२ मुदतवाढ मंजूर करणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत भुयारी गटार योजना भाग-२ सदर कामास मुदतवाढ मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी या कार्यालयास विनंती केली आहे. सदरील कामाची प्र.मा. किंमत विकासकामासाठी रू. ३१६४.८६ लाख व भूसंपादनासाठी रू. २५.०० लाख अशा एकूण रू. ३१८९.८६ लाख असून, निविदा किंमत रू.६१९.५० लाख आहे. स्विकृत किंमत १५.७५% जास्त दराने म्हणजे रू.७१७०७४७२/- आहे. कामाचे आदेश पत्र क्र.५५७ दि.२७/०४/२०११, चालूदर सुचीचा देकार ७.९७% जास्त दराने आहे, कामाची मुळ मुदत दि.२६/०४/२०१२ रोजी पूर्ण झाली आहे. ठेकेदारास ०८/१०/२०१२ रोजीच्या बैठकीत विषय क्रं ६ नुसार उर्वरीत कामासाठी (जे जागे अभावी करता आले नाही ते ) मुल्य दर वाढीसह दिनांक ३१/०३/२०१३ पर्यंत मुदत वाढ ठराव क्रं २०२ नुसार मंजुर करण्यात आली. तथापि वाढीव मुदतीत काम पुर्ण न झाल्याने उपविभागीय अभियंता मजीप्रा उपविभाग उस्मानाबाद यांनी पत्र क्रं ३१९ दिनांक २३/०५/२०१३ अन्वये ३१/१२/२०१३ अखेर पर्यंत मुदतवाढ चालू मुल्य निर्देशांकासह मंजुर करणेस्तव शिफारस केली आहे.

योजनेची मुळ व वाढीव मुदतीत काम न होण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. मलशुध्दीकरण केंद्राकरीताची जागा ताब्यात मिळण्यास विलंब

अ) या कार्यालयाने दि. १७/०२/२०१० रोजी भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सादर केला.

ब) दि. २९/०७/२०१० रोजी संयुक्त मोजणी झाली.

क) या कार्यालयायने दि. १४/०७/२०११ रोजी जमिनीच्या किंमतीचा धनादेश दिला. सदर जमिनीची मालकी श्री. जगदंबा देवस्थान तुळजापूरची आहे.

ड) दि. ०८/०२/२०११ रोजी भुसंपादन अधिकारी यांनी कलम ४ ची अधिसुचना वर्तमान पत्रात (एकमत- ०६/०१/२०१२ व संघर्ष ०५/०१/२०१२ ) प्रसिध्द केले.

इ) भुसंपादन अधिकारी उस्मानाबाद यांचे पत्र क्रं २०१०/ एलएनक्यु/सीआर/२/ दि. ०३/०३/२०१२ अन्वये कलम ४(१) ची नोटीस तामील झाली आहे.

फ) दि. ०९/०३/२०१२ रोजी भुसंपादन अधिकारी उस्मानाबाद यांनी ५/अ स्थळ पाहणी केली आहे.

ग) सदर भुसंपादन प्रकरण ६ ची अधिसुचना काढण्याची कार्यवाही अंतिम स्तरावर होती. परंतू पाटबंधारे विभागाची सिंधफळ ते रामदरा पर्यंतची उध्दरण नलिका ही सदर जागेच्या मधोमध जात असल्याचे पाटबंधारे विभागाकडून कळाले. त्या नंतर दोन्ही खात्याचे कार्यकारी अभियंता यांनी एकत्र बैठक घेवून यातून मार्ग काढावा असे मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले त्यानुसार दि. २०/०४/२०१२ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पाटबंधारे खात्यास पाईप टाकण्यासाठी कमीत कमी अत्यावश्यक जागा (क्षेत्र) द्यावे असे ठरले. त्याप्रमाणे नंतर भुसंपादन अधिकारी यांनी सदर बाबतीत सुधारीत प्रस्ताव पाठविण्याचे सांगितले. त्यानुसार या कार्यालयाने सदर जागेचा सुधारीत प्रस्ताव दि. १६/०६/२०१२ रोजी मा. जिल्हाधिकारी यांना सादर केला. तसेच पुनश्च मोजणी करण्याकरीता उप अधिक्षक भुमि अभिलेख तुळजापूर यांनी सांगितलेली तातडीची मोजणी फी दि. १९/०६/२०१२ रोजी भरणा केली आहे. अशा प्रकारे पाठपुरावा करुन ही अद्यापर्यंत सदरील जमिन ताब्यात मिळणेस विलंब झाला.

२. मलशुध्दीकरण केंद्राचे सुधारीत डिझाईन व ड्रॉईंग नुसार उत्खननाचे कामाचे वाढीव परिमाणास दि. ०२/०५/२०१३ रोजी मंजुरी मिळाली. त्यामुळे उत्खननाचे वाढीव काम व इनलेट, ग्रीड चेंबर, इनर्टरनल आरसीसी पाईप लाईन व ड्रॉप चेंबरचे काम करता आले नाही

३. संप व पंपहाऊसचे कामाच्या विलंबा बाबत

अ. संप व पंपहाऊस जागेचे खाजगी जमीन मालकाकडून सम्मंतीपत्र दि. १२/०७/२०११ रोजी मिळाले.

ब. सदरील जागेची मोजणी करण्या करीता या कार्यालयाने उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय तुळजापूर यांचेकडे दि. २८/०७/२०११ रोजी प्रस्ताव सादर केला.

क. दि. २४/०८/२०११ रोजी सदर जागेचे सम्मती पत्र मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केले.

ड. दि. १२/०४/२०१२ सदरील जागेचे संयुक्त मोजणी करुन मिळाली.

इ. संप व पंपहाऊसचे काम प्रगतीपथावर असताना जागेच्या मालकी वादामुळे काही दिवस न्यायालयाच्या आदेशामुळे बंद ठेवावे लागले.

वरील बाबी पाहता ठेकेदारांने जरी मुल्यदरवाढ व दर फरकाची मागणी केली असली तरी या विभागा तर्फे फक्त मुळ मुदतीत झालेले काम वगळता उर्वरीत कामासाठी मुल्य दरवाढी सह दि.३१/१२/२०१३ पर्यंत यापुर्वी मंजुर केल्याप्रमाणे मुदत वाढीची शिफारस कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी या कार्यालयास केली होती. अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ, उस्मानाबाद यांनी कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांचे प्रस्तावात नमूद केलेल्या १ ते ३ कारणांचा विचार करून व स्विकृत निविदेमध्ये भाववाढ कलमाचा अंतर्भाव नसल्यामुळे, भाववाढ देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी यंत्रणेकडून मागणी केल्यानुसार दि. ३१/१२/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करणे योग्य होईल. वाढीव मुदतीसाठी वर नमूद केलेप्रमाणे भाववाढ देय होणार नाही असे अभिप्रायामध्ये नमूद केले.

सदरील विषयावर सविस्तर चर्चा होवून भुयारी गटार योजना भाग-२ या कामास दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २२८** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. १०: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजनेतील घर जोडणी (House Connection) च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर भुयारी गटार योजना भाग-१ चे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भुयारी गटार योजनेच्या मुख्य चेंबरला घरगुती कनेक्शन जोडण्याची जबाबदारी नगर परिषद तुळजापूरची आहे. त्यामुळे मूळ अंदाजपत्रकामध्ये सदरील बाबींचा समावेश करण्यात आलेला नव्हता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून भुयारी गटार योजनेचे जवळपास ७०% काम पूर्ण झालेले आहे. भुयारी गटार योजनेचे काम चालू असताना किंवा रस्त्याची कामे करण्याअगोदर घरगुती कनेक्शन जोडणे आवश्यक आहे. परंतु नगर परिषकडून तशी कार्यवाही झालेली नाही.

तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये चर्चा झाल्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगर परिषद तुळजापूर यांनी समन्वय साधून सदरील कामाबाबत निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार भुयारी गटार योजनेमधील चेंबरपर्यंत घरगुती जोडणी करण्याबाबत होणारा खर्च जास्त आहे. तुळजापूर नगर परिषदेची आर्थिक क्षमता नसल्यामुळे सदरील काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून करावे असे नगर परिषद तुळजापूर यांनी ठरावाद्वारे कळविले आहे. तसेच नगर परिषदेकडून करावयाचे झाल्यास त्यास कालावधी जास्त लागेल. त्याकरीता भुयारी गटार योजनेची इतर कामे बंद ठेवावी लागतील. परिणामी तुळजापूर शहरातील रस्त्याची कामेही करण्यास विलंब होईल. त्यामुळे तुळजापूर विकास प्राधिकरणामध्ये सदरील कामाची तरतूद करून रू. ३,५६,६०,४००/- (रू. तीन कोटी छपन्न लाख साठ हजार चारशे फक्त)च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे.

हे काम हाती घेणेबाबत नगर परिषदेने दि.०८/०३/२०१३ च्या बैठकीमध्ये ठराव क्र. १७४ मंजूर केला आहे. प्रस्तावित काम हे मंजूर आराखड्यामध्ये व मंजूर अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसल्याने म.जी.प्रा.कडून नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव आल्याने यापूर्वीच्या कामांना निधी उपलब्धतेची खात्री करून मंजुरी देणे प्रलंबित आहे.

सदरील कामाची प्रशासकीय मान्यता किंमत, कामावरील झालेला खर्च, मंजूर अतिरिक्त बाबी व उर्वरित शिल्लक निधी तसेच सदरील काम मंजूर निधीपेक्षा जास्तीचा आहे किंवा मूळ मंजूर किंमतीमध्ये समाविष्ट आहे या सर्व बाबींचा सविस्तर प्रस्ताव म.जी.प्रा.ने तपासून सादर करावा, तोपर्यंत सदरील कामास मूळ प्रशासकीय किंमतीच्या अधीन राहून तत्वत: मान्य करत असल्याचे दि.२३/०५/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचीत केले होते.

अद्यापपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी प्रशासकीय मान्यता किंमत, कामावरील झालेला खर्च, मंजूर अतिरिक्त बाबी व उर्वरित शिल्लक निधी तसेच सदरील काम मंजूर निधीपेक्षा जास्तीचा आहे किंवा मूळ मंजूर किंमतीमध्ये समाविष्ट आहे या सर्व बाबींचा सविस्तर प्रस्ताव सादर केला नाही. तरी सदरील सर्व बांबीच्या तपशीलासह एक आठवड्यामध्ये अहवाल सादर करावा व पुढील बैठकीत विषय चर्चेसाठी ठेवावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.

**विषय क्र.११:- तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भवानी मंदिर ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी १२ मी. रूंदीचा खांडकी व कॉंक्रीट रस्ता विकसीत करणे कामाच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भवानी मंदिर ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी १२ मी. रूंदीचा खांडकी व कॉंक्रीट रस्ता विकसीत करणे या कामास दि. १७/०९/२०११ च्या आदेशान्वये विकास कामासाठी रू. २३८.९५ लाख व भूसंपादनासाठी रू. ३३५.४५ लाख अशा एकूण ५७४.४० लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदरील कामाची रितसर निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली असता एकूण पाच निविदांची विक्री होवून दि. २२/०५/२०१३ रोजी निविदा स्विकृती ठेवली असता पाच पैकी एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त चार निविदांपैकी तांत्रिक तपासणी अंती तीन निविदा पात्र ठरल्या. दि. १७/०६/२०१३ रोजी पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. स्नेअस हायडेल प्रा.लि.कळंब | 4.99 % above | L1 |
| २ | मे. सिध्देश्वर ट्रेडर्स, उस्मानाबाद | 5.70 % above | L2 |
| ३ | मे. बालाजी कन्स्ट्रक्शन, उमरगा | 7.00 % above | L3 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. स्नेहल हायडेल प्रा.लि. कळंब यांनी दिलेले निविदा दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99% जास्त दराचे आहे. तरी सदरील ठेकेदार यांनी सादर केलेले निविदेतील दराबाबत संबंधितास तु.वि.प्रा. बैठकीत वाटाघाटीसाठी बोलवून निर्णय घेणेबाबत मुख्याधिकारी, न.प.तुळजापूर यांनी विनंती केली होती.

सदरील विषय चर्चेस आला असता १२ मी. रूंदीची नगररचनाकार यांनी उपअधीक्षक, भूमी अभिलेख, तुळजापूर व मुख्याधिकारी, न.प.तुळजापूर यांचे समवेत प्रत्यक्ष मोजणी करून खुणा करून द्यावेत. त्यानुसार जागेवरील अतिक्रमण पूर्णपणे हटवून जागा ताब्यात मिळाल्यानंतरच निविदा मंजुरीबाबत पुढील बैठकीत विषय चर्चेस ठेवावा तसेच सदरील निविदा ई-निविदा पध्दतीने केलेली नसल्यास ई-निविदा पध्दतीनेच करावी असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.

सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी आभार व्यक्त करून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.प्रा. यांचे स्वाक्षरीत.**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तुळजापूर विकास प्राधिकरण
उस्मानाबाद करीता.

## श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम,
## तुळजापूर विकास प्राधिकरण, दिनांक २७/०९/२०१३ बैठक इतिवृत्त

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत व खालील विषयावर चर्चा करणे करिता, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक शुक्रवार दिनांक २७/०९/२०१३ रोजी, दुपारी ०१:०० वा. सर्कीट हाऊस, तुळजापूर येथे संपन्न झाली. सदर बैठकीस सन्माननीय सदस्य व तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत संबंधित कार्यान्वयीन अधिकारी उपस्थित होते.

बैठकीतील विषयास सुरूवात करण्यापूर्वी तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या तिन्ही भक्त निवासामध्ये करण्यात येणाऱ्या फर्निचरच्या कामाचे सादरीकरण कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर यांनी सभागृहासमोर सादर केले. फर्निचरसाठी तिन्ही भक्त निवासामध्ये खालीलप्रमाणे अपेक्षित खर्च होणार असल्याचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

(रू.लाखात)

| अ.क्र. | कामाचे नाव | प्र.मा.किंमत | फर्निचरची किंमत | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे (१४४ खोल्या) | १३८१.०० | ३४६.८८ | १७२७.८८ |
| २ | मंदिराशेजारी भक्त निवास व शॉपींग सेंटर बांधणे | ६५१.३५ | ७५.२० | ७२६.५५ |
| ३ | यात्रा मैदान येथे भक्त निवास बांधणे | १२०४.५० | २१९.५१ | १४२४.०१ |
| | **एकूण** | **३२३६.८५** | **६४१.५९** | **३८७८.४४** |

उपरोक्त तिन्ही कामाच्या मूळ प्रशासकीय किंमतीमध्ये फर्निचरच्या कामाचा समाविष्ट नाही. त्यामुळे फनिर्चर करणेकरीता रू. ६४१.५९ लाख किंमतीस स्वतंत्र प्रशासकीय मान्यता द्यावी लागणार आहे. सदरील होणारे खर्च हे जास्तीचे असून अंदाजत्रकातील सर्व बाबी तपासून सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचेकडून तपासून घेवून पुढील बैठकीत प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावे असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

नवरात्र महोत्सवास सुरूवात होण्यापूर्वी रखडलेली कामे पूर्ण करावीत, शहरातील उखडलेले सर्व रस्ते मुरूम टाकून वाहतुकीयोग्य करावे, कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. यांनी रस्त्यावर वाहणाऱ्या सांडपाण्याची व्यवस्था करावी, राष्ट्रीय महामार्गावर तसेच तुळजापूर- सोलापूर बाह्यवळण रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत ते बुजवून घ्यावे, गुणवत्ता नियंत्रण कक्षाने वेळोवेळी कामास भेटी देवून काढलेल्या त्रुटींचे अनुपालन करून त्याचा अहवाल सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात यावा. इ. सर्व कामे तात्काळ पूर्ण करणेबाबत मा. अध्यक्षांनी सर्व यंत्रणांना सूचित केले.

कमानवेस मारूती मंदिर ते डॉ.आंबेडकर चौक रस्त्यातील भूमीगत केबल काढून घेणे, आराधवाडी दर्शन मंडप ते शिवाजी दरवाजा रस्त्यावरील सर्व विद्यूत पोल काढून घेणे, आराधवाडी वाहनतळासाठी कनेक्शन देणे, तुळजापूर शहर नवीन पाणीपुरवठासाठी विद्यूत कनेक्शन देणे, बायपास चौकासाठी स्ट्रीटलाईट आवश्यक असल्याने स्ट्रीट लाईटची व्यवस्था करणे इ. कामे महावितरण मार्फत करणेबाबत अधीक्षक अभियंता, महावितरण, उस्मानाबाद तात्काळ कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सूचित केले.

शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील चार सेवा रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याच्या दृष्टिने सदरील कामाचे मुख्याधिकारी, न.प.तुळजापूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, उस्मानाबाद यांनी दि. ३०/०९/२०१३ रोजी संयुक्त पाहणी करून अहवाल सादर करावा, त्यानंतरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल असे मा. अध्यक्ष यांनी सूचित केले.

**विषय क्र. १:- दिनांक ०५/०७/२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक ०५/०७/२०१३ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ, उचित कार्यवाहीसाठी आणि अनुपालनास्तव, सर्व सन्माननीय सदस्य आणि कार्यान्वयीन यंत्रणांना पाठविण्यात आलेले आहेत, तरी इतिवृत्तास मान्यता दयावी अशी विनंती सदस्य सचिव, तु.वि.प्रा. यांनी सभागृहास केली असता त्यावर चर्चा होवून इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. २:- तुळजापूर शहरातंर्गत ३० मुख्य रस्त्याच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर शहरातील विविध २७ मुख्य अंतर्गत रस्त्यांच्या कामांचे एकूण रू. २५०२.२२ लक्ष किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले होते. त्यानंतर त्यांनी दि.०८/१०/२०१२ रोजी बैठकीमध्ये ३० रस्त्यांसाठी रू.२५७४.०० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विनंती केली होती. सदरील विषयी दि. २३/०५/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये निधीच्या उपलब्धतेबाबत विचारले असता

लेखाधिकारी यांनी रू. ११३३.६६ लक्ष किंमतीस कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल, अशी माहिती दिली होती. त्यानुसार रू. ४५०.०० लाख किंमतीच्या चार सेवा रस्त्याच्या कामास मान्यता देणेबाबत ठराव क्र.२१८ मान्य करण्यात आला. रू. ४५० लाख वजा जाता रू. ६८३.६६ लाख किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देता येईल, त्यामुळे प्राधान्यक्रमाने रस्त्याची निवड करून प्रस्ताव तयार करावा व ढोबळ अंदाजपत्रकीय किंमतींसह यादी रस्त्यांची सादर करावी व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. ०५/०७/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये सूचीत केले होते.

त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी सभागृहासमोर रू. ३१.०० कोटी किंमतीची २७ रस्त्यांची यादी सादर केली. सदरील यादीचे अवलोकन केले असता बऱ्याच कामाची किंमत जास्तीची असल्याचे दिसून आले. मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी सदरील सर्व रस्त्यांची पाहणी करून कामाचे अंदाजपत्रक तपासून सादर करावे, सदरील कामाचे नकाशे व प्रेझेन्टेशन तयार करावे व सदरील विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. ३: तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत भुयारी गटार योजनेतील घर जोडणी (House Connection) च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत तुळजापूर शहर भुयारी गटार योजना भाग-१ चे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भुयारी गटार योजनेच्या मुख्य चेंबरला घरगुती कनेक्शन जोडण्याची जबाबदारी नगर परिषद तुळजापूरची आहे. त्यामुळे मूळ अंदाजपत्रकामध्ये सदरील बाबींचा समावेश करण्यात आलेला नव्हता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून भुयारी गटार योजनेचे जवळपास ७०% काम पूर्ण झालेले आहे. भुयारी गटार योजनेचे काम चालू असताना किंवा रस्त्याची कामे करण्याअगोदर घरगुती कनेक्शन जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे तुळजापूर विकास प्राधिकरणामध्ये सदरील कामाची तरतूद करून रू. ३,५६,६०,४००/- (रू. तीन कोटी छपन्न लाख साठ हजार चारशे फक्त)च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी या कार्यालयास विनंती केली होती.

सदरील कामाची प्रशासकीय मान्यता किंमत, कामावरील झालेला खर्च, मंजूर अतिरिक्त बाबी व उर्वरित शिल्लक निधी तसेच सदरील काम मंजूर निधीपेक्षा जास्तीचा आहे किंवा मूळ मंजूर किंमतीमध्ये समाविष्ट आहे या सर्व बाबींचा सविस्तर प्रस्ताव म.जी.प्रा.ने तपासून सादर करावा, तोपर्यंत सदरील कामास मूळ प्रशासकीय किंमतीच्या अधीन राहून तत्वतः मान्य करत असल्याचे दि.२३/०५/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सूचीत केले होते, त्यानुसार घरजोडणीचे काम पूर्ण करणेबाबत कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सूचित केले.

**विषय क्र. ४:- न.प तुळजापूर करिता पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईप लाईन करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत तुळजापूर नळ पाणी पुरवठा योजना (पाचुंदा उद्भव) रू. १४२.४६ लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन रू. ११०.०० लाख निधी नगर परिषद तुळजापूर यांना वितरीत करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत रू. ६९.८० लाख निधी खर्च झाला असुन उर्वरित रू. ४०.००२० लाख निधी नगर परिषदेकडे अखर्चित आहे.

सदर योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आहेत. त्यांनी सदर कामाच्या मुदतवाढीबाबत सविस्तर कारणासह प्रस्ताव सादर केला असून विलंबाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) पाटबंधारे खात्याने उद्भव विहिरीची जागा निश्चित केल्यामुळे व जलशुध्दीकरण मार्ग बदलल्याने लांबीमध्ये वाढ झाल्याने पाईप मागविण्यासाठी विलंब झाला आहे.

२) पंपींग मशीनरीचा तपशील कंत्राटदारास कळविणेस विलंब झाला आहे.

३) नळदुर्ग रोड क्रॉसींगचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याच्या परवानगीस विलंब झाला आहे.

४) विजेचे पुरवठ्यासाठी वीज मंडळाने कोटेशन अद्याप दिलेले नाही.

५) दुष्काळ अपुऱ्या पर्जन्यमानामुळे पाचुंदा तलावात पाणी साठा झालेला नाही, तो झाल्यावर ठेकेदाराने तीन महिने चाचणी देण्याचे आहे.

वरील कारणे समर्पक व वस्तुस्थितीनुसार असल्याने संबंधित ठेकेदारास दि. ३०/०९/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजुर करावी अशी विनंती मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी केली आहे.

त्यानुसार सदरील विषय चर्चेस आला असता फक्त लाईट कनेक्शनच्या कामासाठी भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले. यावर सविस्तर चर्चा होवून दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२२९** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ५:- एस.टी स्टॅन्ड ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी. रस्त्याचे २० मी. रस्त्यात रूपातंर करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत एस.टी स्टॅन्ड ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी. रस्त्याचे २० मी. रस्त्यात रूपातंर करणे या रू. २३१.०० लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन रू. १४७.०० लाख निधी नगर परिषद तुळजापूर यांना वितरीत करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत रू. १४२.३२ लाख निधी खर्च झालेला आहे. सदरील कामाची मुदत दि.२७/०३/२०१३ पर्यंत होती.

सध्या संबंधीत ठेकेदारा मार्फत उजव्याबाजूचे (RHS) फुटपाथचे काम पूर्ण करण्यात आले आहे. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून भुयारी गटार योजनेचे हाऊस कनेक्शन झाले नसलेने केलेले फुटपाथ कनेक्शन ठिकाणी काढून पुन्हा करावे लागणार आहे. याबाबत संबंधीत ठेकेदार यांनी दिनांक २६/०६/२०१३ रोजी हाऊस कनेक्शन चे काम करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने व केलेल्या काम पून्हा करावे लागणार असल्याने मुदतवाढीचा कालावधी वाढवून दयावा.अशी विनंती केली होती. तरी संबधीत ठेकेदारास हाऊस कनेक्शन जोडणीचा कालावधी गृहीत धरुन दि. २७/०७/२०१३ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मुख्याधिकारी नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता प्राधिकरणांतर्गत अशा कामास भाववाढ देता येणार नसून सदरील कामास दि.३०/०९/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून अंतिम मुदतवाढ देणेबाबत मा. अध्यक्षांनी सूचीत केले. यावर सविस्तर चर्चा होवून सदरील कामास दि.३०/९/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून अंतिम मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२३०** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ६:- कमानवेस ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी रस्ता विकसीत करणे कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत कमानवेस ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक १२ मी रस्ता विकसीत करणे या रू. ३८०.०० लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येऊन रू. १००.०० लाख निधी नगर परिषद तुळजापूर यांना वितरीत करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत रू. ८१.४९ लाख निधी खर्च झालेला आहे. सदरील कामाची मुदत दि.२७/०३/२०१३ पर्यंत होती.

इलेक्ट्रीक पोल व पाणी पुरवठा लाईन शिफ्टींग, भुसंपादन होवून इमारतीचे पाडकाम , नवरात्र व गणेश जयंती इत्यादी. कारणामुळे प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली नाही. त्यामुळे सदर कामास दि.१७/१२/२०१३ पर्यंत (EP मधील भाग वगळून) मुदतवाढ देणे बाबत मुख्याधिकारी नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता सदरील कामास दि.३०/१२/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून अंतिम मुदतवाढ देणेबाबत मा. अध्यक्षांनी सूचीत केले. यावर सविस्तर चर्चा होवून सदरील कामास दि.३०/१२/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून अंतिम मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २३१** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ७:- भवानी मंदिर ते शिवाजी चौक १८मी. रस्ता विकसीत करणे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत भवानी मंदिर ते शिवाजी चौक १८मी. रस्ता विकसीत करणे कामास दि. २९/१०/२०११ च्या आदेशान्वये रू. ३११.०० लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

सदरील रस्ता खांडकी व सिमेंटचा करावयाचे ठरले असल्याने कामाच्या मूळ प्रशासकीय मान्यता किंमतीमध्ये वाढ होवून त्याची किंमत रू. ४६०.०० लाख इतकी झाली आहे. सदरील वाढीव किंमतीसह सुधारित अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी सादर करून विषयांकीत कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत विनंती केली आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता हा रस्ता अत्यंत महत्वाचा असून सदरील रस्ता खांडकी व सिमेंटचा करावयाचे असल्याने त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभागृहाने मान्य केले. यावर सविस्तर चर्चा होवून भवानी मंदिर ते शिवाजी चौक १८मी. रस्ता विकसीत करणे कामाच्या रू. ४६०.०० लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत **ठराव क्र.२३२** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ८:- आराधवाडी दर्शन मंडप ते शिवाजी दरवाजा ९ मी. रस्ता करणे कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत आराधवाडी दर्शन मंडप ते शिवाजी दरवाजा ९ मी. रस्ता करणे कामाचे भूसंपादन करण्यासाठी दि. १६/०६/२०११ च्या आदेशान्वये रू. २१.०६ लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

सदरील कामाचा भूसंपादन निवाडा होवून नगर परिषदेमार्फत बाधीत इमारतीचे पाडकाम पूर्ण करण्यात आले आहे. तरी विषयांकीत रस्त्याचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेबाबत दि. २८/०८/२०१३ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार विकास कामाचे रू. ५७.३९ लक्ष किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता हा रस्ता अत्यंत महत्वाचा असून सदरील रस्ता सिमेंटचा करावयाचे असल्याने त्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत सभागृहाने मान्य केले. यावर सविस्तर चर्चा होवून आराधवाडी दर्शन मंडप ते शिवाजी दरवाजा ९ मी. रस्ता करणे या कामाच्या रू. ५७.३९ लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत **ठराव क्र.२३३** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ९:- आयत्या वेळचे विषय.**

**अ) तुळजापूर शहरातुन शहराबाहेर जाणा-या सोलापूर-धुळे बाहयवळण रस्त्याचे बाधंकाम करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.**

सदरील कामास दिनांक दि.२३/०५/२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १८१ अन्वये दि. ३१/११/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. यांचे पत्र दि.०४/०६/२०१३ अन्वये सदर कामास दि.३१/०३/२०१३ पर्यंत भाववाढीसह कार्योत्तर मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता.

सदरील विषयी बैठकीत चर्चा होवून असे ठरले की, तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत कोणत्याही कामांना भाववाढ देता येणार नाही, त्यामुळे सदरील कामास दि.३१/०३/२०१३ पर्यंत भाववाढखंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२३४** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**ब) तुळजापूर शहरातुन शहराबाहेर जाणा-या सोलापूर-धुळे बाहयवळण रस्त्याचे विकास कामाची व भूसंपादनाची रक्कम वसूल करणेबाबत**

सदरील रू. १८५६.०० लक्ष किंमतीचे काम तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत पूर्ण करण्यात आले आहे. सदर बाह्यवळण रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) विभाग ताब्यात घेणार असल्याचे कळविले आहे. याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सदरील कामासाठी प्राधिकरणातून विकास कामासाठी व भूसंपादनासाठी खर्च झालेला संपूर्ण निधी तुळजापूर विकास प्राधिकरणास परत करणेबाबत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेकडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत व झालेल्या खर्चाची रक्कम प्राप्त झाल्यानंतरच रस्ता हस्तांतरीत करणेबाबत **ठराव क्र.२३५** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी आभार व्यक्त करून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष तु.वि.प्रा.यांचे स्वाक्षरीत.**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तुळजापूर विकास प्राधिकरण
उस्मानाबाद करीता

## श्री क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास कार्यक्रम, तुळजापूर विकास प्राधिकरण, सर्वसाधारण समिती दिनांक २३/०१/२०१४ बैठक इतिवृत्त

श्री. क्षेत्र तुळजापूर मंदिर, मंदिर परिसर व शहर विकास आराखडयातील विकास कामाबाबत व खालील विषयावर चर्चा करणे करिता, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, तुळजापूर विकास प्राधिकरणाची बैठक गुरूवार दिनांक २३/०१/२०१४ रोजी, दुपारी १२:३० वा. सर्कीट हाऊस, तुळजापूर येथे संपन्न झाली. सदर बैठकीस सर्व सन्माननीय सदस्य व तुळजापूर विकास प्राधिकरणातंर्गत संबंधित कार्यान्वयीन अधिकारी उपस्थित होते.

**विषय क्र. १:- दिनांक २७/०९/२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २७/०९/२०१३ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरण बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ, उचित कार्यवाहीसाठी आणि अनुपालनास्तव, सर्व सन्माननीय सदस्य आणि कार्यान्वयीन यंत्रणांना पाठविण्यात आलेले आहेत, तरी इतिवृत्तास मान्यता दयावी अशी विनंती सदस्य सचिव, तु.वि.प्रा. यांनी सभागृहास केली असता त्यावर चर्चा होवून इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. २:- तुळजापूर शहरातंर्गत ४६ मुख्य रस्त्याच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर शहरातील विविध २७ मुख्य अंतर्गत रस्त्यांच्या कामांचे एकूण रू. २५०२.२२ लक्ष किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केले होते. याबाबत ढोबळ अंदाजपत्रकीय किंमतींसह रस्त्यांची यादी सादर करावी व सदरील विषय पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी दि. ०५/०७/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये सूचीत केले होते. त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी दि. २७/०९/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये रू. ३१.०० कोटी किंमतीची २७ रस्त्यांची यादी सादर केली. सदरील यादीचे अवलोकन केले असता बऱ्याच कामाची किंमत जास्तीची असल्याचे दिसून आले. मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी सदरील सर्व रस्त्यांची पाहणी करून कामाचे अंदाजपत्रक तपासून सादर करावे व सदरील विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले होते. त्यानुसार ४६ रस्त्यांची सुधारीत यादी अंदाजपत्रकासह मुख्याधिकारी न.प. यांनी प्राधिकरणास सादर केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

**तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत शहरातील प्रस्तावित ४६ रस्त्याची सुची सन २०१३-१४**

| अ.क्र. | रस्त्याचे नावे | लांबी | कॅ रुंदी | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | भवानी रोड (दिपक चौक) ते घाटशिळ मंदिर | 310 | 5.50 | 55,92,272 |
| २ | घाटशिळ पार्कींग पुर्व बाजूचा रस्ता | 150 | 5.50 | 26,49,292 |
| ३ | घाटशिळ पार्कींग पश्चिम बाजूचा रस्ता | 135 | 5.50 | 23,91,664 |
| ४ | बिडकर तलाव, वेताळ गल्ली, समाज मंदीर ते स्मशानभुमी | 500 | 5.50 | 34,98,173 |
| ५ | बाबजी लाकूड अड्डा ते कमान वेस मारूती मंदीर | 150 | 5.50 | 26,46,382 |
| ६ | लातूर रोड (एस.टी.डेपो) ते नळदुर्ग रोड ( लोहिया मंगल कार्यालय पर्यंत ) | 325 | 5.50 | 57,36,253 |
| ७ | लातूर रोड (एस.टी.डेपो) ते नळदुर्ग रोड ( लोहिया मंगल कार्यालय पासुन नळदुर्ग रोड पर्यंत ) | 325 | 5.50 | 57,36,253 |
| ८ | NH २११ ते शुक्रवार पेठ (यात्रा मैदाना पर्यंत) | 200 | 5.50 | 35,30,450 |
| ९ | NH २११ ते शुक्रवार पेठ (यात्रा मैदानापासुन शुक्रवार पेठ पर्यंत) | 200 | 5.50 | 35,30,450 |
| १० | कणे बापू MRF शोरूम ते मायक्रो स्टेशन (हाडको कोपऱ्या पर्यंत ) | 235 | 5.50 | 42,77,539 |
| ११ | कणे बापू MRF शोरूम ते मायक्रो स्टेशन (हाडको कोपऱ्या पासुन मायक्रोस्टेशन पर्यंत ) | 235 | 5.50 | 42,77,539 |
| १२ | NH २११ ते कमान वेस (उत्तर व दक्षिण बाजु) | 116 | 5.50 | 19,27,220 |
| १३ | आरण्यमठ ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी | 225 | 3.70 | 22,45,442 |
| १४ | अंबाई हॉस्पीटल , व्यवहारे बिल्डींग ते मायक्रो स्टेशन रोड | 310 | 5.50 | 54,70,160 |
| १५ | आ.क्र. ९ वाहनतळ ते आठवडा बाजार कोपरा | 200 | 5.50 | 35,30,450 |
| १६ | कन्या प्रशाला ते बाबजी ल ाकूड अड्डा | 140 | 5.50 | 24,71,897 |
| १७ | हाडको मारूती मंदीर ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी | 335 | 5.50 | 59,10,739 |
| १८ | वेताळ मंदीर ,बारालिंग मंदीर ते बायपास रस्ता (घाट रस्ता) | 500 | 3.70 | 25,65,983 |

| अ.क्र. | रस्त्याचे नावे | लांबी | कॅ रुंदी | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १९ | शुक्रवार पेठ पाण्याची टाकी , जिजामाता नगर मार्गे मायक्रो स्टेशन | 450 | 3.70 | 48,84,914 |
| २० | अपसिंगा रोड लमाण तांडा , स्मशानभुमी ते मायक्रो स्टेशन रोड (जुनी तहसील क्वॉटर पर्यंत) | 370 | 3.70 | 44,17,391 |
| २१ | अपसिंगा रोड लमाण तांडा , स्मशानभुमी ते मायक्रो स्टेशन रोड (जुनी तहसील क्वॉटरपासुन मायक्रो स्टेशन पर्यंत) | 370 | 3.70 | 44,17,391 |
| २२ | मायक्रो स्टेशन रोड ते हाडको मैदान | 210 | 5.50 | 37,04,935 |
| २३ | विश्वास नगर अंतर्गत रस्ता ( बगीचेची उत्तर व दक्षिण बाजु रस्ता) | 250 | 5.50 | 44,11,607 |
| २४ | विश्वास नगर अंतर्गत रस्ता ( न.प.भुखंड परिसर रस्ते) | 490 | 3.70 | 58,49,847 |
| २५ | बोरगांवकर कॉम्पलेक्स ते नियोजित रिंग रोड | 310 | 5.50 | 54,70,160 |
| २६ | कदम हॉस्पीटल ते नियोजित रिंग रोड | 320 | 5.50 | 54,24,242 |
| २७ | इंजि. कॉलेज गेट ते पापनाश तलाव कोपरा | 400 | 3.70 | 70,60,900 |
| २८ | एस.कॉलनी गंगणे प्लॉटिंग ते नळदुर्ग रोड | 285 | 5.50 | 50,29,581 |
| २९ | बोरगांवकर हाऊस ते स.नं. १९२ कडे जाणारा रस्ता | 120 | 3.70 | 14,32,456 |
| ३० | A.P. लॉज ते नविन पोलिस संकुल | 560 | 3.70 | 44,73,118 |
| ३१ | कोंडो प्लॉटींग अंतर्गत रस्ते | 285 | 3.70 | 14,46,717 |
| ३२ | तुळजापूर कोर्ट ते दिपक चौक रस्ता | 130 | 3.70 | 15,42,654 |
| ३३ | मुलींचे शासकीय वसतीगृह, वाय सी कॉलेज, नवोदय विद्यालय ते नळदुर्ग रोड (आयटीआय ते वायसी कॉलेज) | 250 | 3.70 | 32,46,751 |
| ३४ | मुलींचे शासकीय वसतीगृह, वाय सी कॉलेज, नवोदय विद्यालय ते नळदुर्ग रोड (आयटीआय ते नळदुर्ग रोड) | 400 | 3.70 | 47,62,357 |
| ३५ | NH २११ बीएसएनएल ऑफीस ते शुकवार पेठ पाण्याची टाकी ( आठवडी बाजार पर्यंत) | 200 | 5.50 | 35,30,450 |
| ३६ | NH २११ बीएसएनएल ऑफीस ते शुकवार पेठ पाण्याची टाकी ( आठवडी बाजार ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी) | 200 | 5.50 | 35,30,450 |
| ३७ | घाटशिळ पार्कींग ते न.प.शाळा क्र.२ रस्ता | 95 | 3.70 | 11,34,354 |
| ३८ | नगर परिषद कोपरा ते जवाहर गल्ली रस्ता | 110 | 3.70 | 13,14,390 |
| ३९ | सर्कीट हाऊस ते शेख फरीद रस्ता (सां.बा.क्वॉटर) | 200 | 3.70 | 23,88,731 |
| ४० | शिवाजी चौक पेट्रोल पंप ते घाटशिळ रोड (न.प.शाळा क्र.२ पर्यंत) | 265 | 5.50 | 43,94,827 |
| ४१ | शिवाजी चौक पेट्रोल पंप ते घाटशिळ रोड (न.प.शाळा क्र.२ ते घाटशीळ पार्कींग १०८ धर्मशाळा पर्यंत) | 265 | 5.50 | 43,92,292 |
| ४२ | बिडकर तलाव ते भवानी रोड पावन लॉज रस्ता | 160 | 3.70 | 8,08,174 |
| ४३ | पंचायत समिती ते सर्कीट हाऊस रस्ता | 150 | 3.70 | 17,90,570 |
| ४४ | पापनास तलाव ते पंचायत समिती कोपरा पर्यंत रस्ता | 400 | 3.70 | 21,28,264 |
| ४५ | यात्रा मैदान ते सराया धर्मशाळा | 300 | 5.50 | 50,91,933 |
| ४६ | लातुर रोड गोपीका नगर, लोंढे घर ते नळदुर्ग रोड | 600 | 3.70 | 58,07,769 |
| | **एकूण** | **12736** | | **17,18,75,383** |

वरीलप्रमाणे रस्त्यांच्या कामांना मंजुरी देणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी विनंती केली आहे. शहरांतर्गत महत्वाची रस्त्याची कामे घ्यावयाची असल्यामुळे व शासनाकडून मान्यता नसल्याने प्रशासकीय मान्यता रू. ३१५०३.७६ लक्ष मर्यादेत मंजूर कार्यक्रम ठेवण्यात यावा यादृष्टिने वरील कामांना मंजुरी द्यावयाची झाल्यास खालील कामांची प्रशासकीय मान्यता तूर्त रद्द करून होणाऱ्या बचतीतून वरील कामे करणे योग्य राहील असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा लेखाधिकारी तु.वि.प्रा. यांनी सभागृहास सांगितले..

| अ.क | कामाचे नांव | प्रशासकीय मान्यता किंमत (रू. लाखात) | | |
|---|---|---|---|---|
| | | विकास कामाची | भूसंपादन किंमत | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **मुख्याधिकारी नगर परिषद** | | | |
| १ | लातुर रोडलगत वाहनतळ विकसीत करणे आ. सर्वे. क्र. १४०, १४१. क्षेत्र ११.२८० चौ.मी. | 340.00 | 81.00 | 421.00 |
| २ | तुळजा भवानी मंदिरा जवळ सुलभ शौचालय बांधणे. | 39.23 | 0.00 | 39.23 |
| ३ | एस.टी.स्टॅन्ड जवळ, शिवाजी चौक, उस्मानाबाद रोडवर प्रत्येकी एक प्रमाणे तीन पोलीस चौकी बांधणे | 60.00 | 0.00 | 60.00 |
| ४ | विविध कुंडाचे सुशोभिकरण करणे | 57.42 | 0.00 | 57.42 |
| ५ | घाटशिळ रोड वाहनतळ येथे दुकानकेंद्र, धर्मशाळा, उपहार गृह व प्रतिक्षालय बांधणे | 482.00 | 0.00 | 482.00 |
| | **एकुण न.प** | **978.65** | **81.00** | **1059.65** |
| | **कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग** | | | |
| १ | उस्मानाबाद रोड सारा सिटी जवळ प्रवेशद्वार करणे | 402.83 | 0.00 | 402.83 |
| २ | सोलापूर रोड घाटशिळ पायथ्या जवळ प्रवेशद्वार करणे. | 402.83 | 0.00 | 402.83 |
| | **एकुण वि.प्र.वि** | **805.66** | **0.00** | **805.66** |
| | **कार्यकारी अभियंता, साबांवि** | | | |
| १ | लातुर रोड कृषि उत्पन्न बाजार समिती जवळ प्रवेशद्वार करणे | 402.83 | 0.00 | 402.83 |
| २ | नळदुर्ग रोड अभियांत्रिकी महाविद्यालया जवळ प्रवेशद्वार करणे | 402.83 | 0.00 | 402.83 |
| | **एकुण सा.बां.वि** | **805.66** | **0.00** | **805.66** |
| | **तुळजाभवानी मंदिर संस्थान** | | | |
| १ | श्री. तुळजाभवानी मंदिर परिसर स्वतंत्र पोलीस चौकी बांधणे | 51.00 | 0.00 | 51.00 |
| | **एकुण मंदिर संस्थान** | **51.00** | **0.00** | **51.00** |
| | **जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद** | | | |
| १ | ग्रामीण रूग्णालय तुळजापूर करीता अत्यावश्यक यंत्रसामुग्री साहित्य खरेदी करणे. | 70.00 | 0.00 | 70.00 |
| | **एकूण** | **70.00** | **0.00** | **70.00** |
| | **एकुण सर्व (११ कामे)** | **2710.97** | **81.00** | **2791.97** |

प्रस्तावित ४६ कामांपैकी ४२ कामांच्या अंदाजपत्रकासोबत रस्त्याच्या जागेचे नगर परिषदेच्या मालकीचे प्रमाणपत्र व सदर रस्त्यावर मागील तीन वर्षात कोणतेही काम केले नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले आहे व उर्वरित ४ कामांना सदरील दोन्ही प्रमाणपत्र जोडले नसल्याचे सदस्य सचिव, तु.वि.प्रा. यांनी सभागृहास सांगितले.

सदर रस्त्यांच्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये मलनि:सारणाच्या घरजोडणीचा समावेश करण्यात आलेला आहे, परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या नालीचे काम रस्त्याच्या अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने ते काम नगर परिषदेने इतर योजनेतून करावे अशा सूचना मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन शहरातंर्गत ४६ रस्त्यांपैकी जागेच्या मालकीचे प्रमाणपत्र नसलेली ४ कामे वगळून उर्वरित ४२ रस्त्यांना नगर परिषदेच्या जागेचे मालकीचे प्रमाणपत्र व सदर रस्त्यावर मागील तीन वर्षात कोणतेही काम केले नसल्याचे प्रमाणपत्र घेऊन व सदरील ४२ कामांच्या अंदाजपत्रकातील १० % भाववाढ व ३% आकस्मिक खर्च या बाबी वगळून रू. १३७५.४९ लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत व प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु सध्या सुरू नसलेल्या रू २७९१.९७ लक्ष किंमतीच्या एकुण ११ कामांची प्रशासकीय मान्यता तूर्त रद्द करणेबाबत **ठराव क्र. २३६** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ३. भवानी मंदीर महाद्वार ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी १२ मी रुंदीचा खांडकी व कॉक्रीट रस्ता विकसीत करणे कामाच्या निविदेस मंजुरी देणे बाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत भवानी मंदीर महाद्वार ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी १२ मी रुंदीचा खांडकी व कॉक्रीट रस्ता विकसीत करणे या कामासाठी तुळजापूर विकास प्राधिकरण बैठक दि.१७/०९/२०११ रोजी ठराव क्र १६५ अन्वये विकास कामासाठी रु. २३८.९५ लक्ष व भुसंपादनासाठी ३३५.४५ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

वरील कामाविषयी नगर परिषद अधिनियम व स्थायी निदेश विचारात घेवून दै.संघर्ष मध्ये दिनांक ११/१२/२०१३ रोजी व दै.सकाळ मध्ये दि. १२/१२/२०१३ रोजी जाहिर ई- निविदा ( तिसरी वेळ ) रितसर प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदांचा धारकांचे नावे खालील प्रमाणे.

१.बालाजी कन्सट्रक्शन,उमरगा, २.स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे.

उपरोक्त ई-निविदा दि. २७/१२/२०१३ रोजी तांत्रिक लिफाफा क्र.१ उघडण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. निविदा धारकांने सादर केलेल्या लिफाफा क्र.१ मधील तांत्रिक बाबीची तपासणी सखोलपणे करण्यात आली. प्राप्त झालेल्या दोन निविदा पैकी एक निविदा पात्र झाली होती. बालाजी कन्स्ट्रक्शन, उमरगा यांनी दाखल केलेले कागदपत्रे सत्यप्रतीत नसल्याने त्यांची निविदा अपात्र झाली. परंतु लेखाधिकारी तु.वि.प्रा. यांचे सूचनेनुसार कागदपत्राची पूर्तता करण्यात येवून दुसरी निविदाही पात्र ठरविण्यात आली.

त्यानुसार पात्र निविदा धारकांचा लिफाफा क्र .२ उघडण्याची प्रक्रिया दि.३०/१२/२०१३ रोजी केली असता त्यांचे प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | निविदा धारकांचे नाव | प्राप्त निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे | अंदाजपत्रकीय दराने | L१ |
| २ | बालाजी कन्स्ट्रक्शन उमरगा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६ % जास्त | L२ |

उपरोक्त ठेकेदार यांनी सादर केलेले निविदेतील दराबाबत संबंधीतास वाटाघाटीसाठी (Negotiation) दि. ३०/१२/२०१३ रोजी कळविले असता, सदर कामाचे अंदाजपत्रक जुने असुन या कामासाठी लागणारे मजुरीचे वेतन, सिमेंट, स्टिल, वाळुचे दर वाढलेले असल्याने निविदेमध्ये नमूद दर योग्य असुन ते मान्य करण्यात यावे याबाबत संबंधीत ठेकेदाराने दि. ०२/०१/२०१४ रोजी कळविले आहे. सदरील निविदेस प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली असता, यावर सविस्तर चर्चा होऊन स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने असल्याने सदरील निविदा मंजूर करणेबाबत **ठराव क्र.२३७** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषय क्र. ४. भवानी मंदिर ते शिवाजी चौक खांडकी व सिमेंट रस्ता करणे कामाच्या निविदेस मंजुरी देणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत भवानी मंदिर ते शिवाजी चौक १८ मी.रुंदीचा खांडकी व कॉंक्रीट रस्ता विकसीत करणेच्या कामास रु. ४६० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर कामाची जाहिर ई-निविदा दै.सकाळ मध्ये दि. १७/१२/२०१३ रोजी व दै.संघर्ष मध्ये दि. १९/१२/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार सदर कामाचे निविदा प्रक्रियेत एकूण सहा निविदा धारकांनी ऑनलाईन निविदा आपलोड केले होते. तथापी एकूण सहा निविदा धारका पैकी तीन निविदा धारकांचे लिफाफा क्र. १ मधील आवश्यक कागदपत्रे व कोरी निविदा फिसचा धनाकर्ष (डी.डी) या कार्यालयास निविदा प्रसिध्द मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १७/०१/२०१४ रोजी प्राप्त झाले असल्याने उर्वरित तीन निविदा धारकांचे निविदा उघडण्यात आलेली नाही. धनाकर्ष (डी.डी) प्राप्त झालेले निविदा धारक खालील प्रमाणे.

१. स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे
२. बालाजी कन्स्ट्रक्शन उमरगा
३. मे.भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी

वरिल प्राप्त निविदा धारकांचा लिफाफा क्र. १ उघडण्याची कार्यवाही दि. १८/०१/२०१४ रोजी करण्यात आली असता वरील तीन निविदा धारक पात्र झाले असल्याने त्यांचा ऑनलाईन लिफाफा क्र. २ दि. २०/०१/२०१४ रोजी उघडण्यात आला. त्यांचे प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | निविदा धारकांचे नाव | प्राप्त निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे | अंदाजपत्रकीय दराने | L१ |
| २ | बालाजी कन्स्ट्रक्शन उमरगा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६ % जास्त | L२ |
| ३ | मे.भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, बार्शी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८ % जास्त | L३ |

स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने असल्याने सदरील निविदेस प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली असता, मा.श्री. आप्पासाहेब पाटील यांनी सदरील रस्ता १८ मी. होत नसल्याचे व त्यावर अतिक्रमण असल्याचे सांगितले. तरी सदरील रस्त्याची भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करून १८ मी. रूंदी असल्याची खात्री करावी या अटीवर स्नेअस हायडेल प्रा.लि.पुणे यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने मंजूर करणेबाबत **ठराव क्र.२३८** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः ५. मंदिराशेजारी भक्तनिवास व शॉपींग सेंटर बांधणे, घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे, यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ या तिन्ही भक्तनिवासामध्ये फर्निचर करणे कामाच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत विषयांकीत फर्निचर कामाचे सविस्तर अंदाज पत्रक व नकाशे यास या कार्यालयाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये फर्निचरच्या कामाचा समावेश नाही. त्यामुळे फर्निचरबाबतचे सर्वेक्षण करण्यात येऊन फर्निचरच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे. सदरील सविस्तर अंदाजपत्रकाची अंदाजीत किंमत खालील प्रमाणे आहे.

(रूपये लाखात)

| अक्र. | कामाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे. | २१६.१४ |
| २ | तुळजापूर येथे मंदिरा शेजारी भक्त निवास व शॉपींग सेंटर बांधणे. | ५०.५४ |
| ३ | यात्रा मैदान तुळजापूर येथे भक्त निवास बांधणे. | १९८.७८ |
| | **एकुण** | **४६५.४८** |
| | आकस्मिक खर्च (४ %) | १८.६२ |
| | दर सुचीतील दरवाढ (१०%) | ४६.५४ |
| | संगणकीकरण (२%) | ९.३१ |
| | **सर्व एकुण** | **५३९.९५** |

सदरील तिन्ही भक्तनिवासामध्ये करण्यात येणाऱ्या फर्निचरचे कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर यांनी संगणकाद्वारे सभागृहासमोर सादरीकरण केले.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तीन कामांच्या अंदाजपत्रकातील १० % भाववाढ, ४% आकस्मिक खर्चापैकी २% व संगणकीकरण २ % या बाबी वगळून, रू. ४७४.७९ लक्ष किंमतीस सुरू नसलेल्या तूर्त स्थगित करण्यात येणाऱ्या रू २७९१.९७ लक्ष किंमतीच्या ११ कामांच्या बचतीतून प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत **ठराव क्र.२३९** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः ६. मंदिराशेजारी भक्तनिवास व शॉपींग सेंटर बांधणे, घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे, यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ येथे फर्निचरची कामे करणे व पापनाश तलाव येथे बगीचा विकसीत करणे कामे करण्यासाठी कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर यांना यंत्रणा म्हणून काम करण्यास मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत बांधण्यात आलेल्या मंदिराशेजारी भक्तनिवास व शॉपींग सेंटर बांधणे, घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे, यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ येथे फर्निचरची कामे करणे व पापनाश तलाव येथे बगीचा विकसीत करणे इ. कामे सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद कार्यालयांतर्गत येणाऱ्या कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर यांचेकडे सोपविण्यात आल्याचे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बाधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी दि. १७/०१/२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे. मंदिराशेजारी भक्तनिवास व शॉपींग सेंटर बांधणे, घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे, यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ येथे फर्निचरची कामे करणे व पापनाश तलाव येथे बगीचा विकसीत करणे या कामांपैकी यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ हे काम शासनमान्य आराखड्यामध्ये यंत्रणा म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे व उर्वरित कामे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान यांचेकडे सोपविलेली आहेत. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर ही तुळजापूर विकास प्राधिकरणाची यंत्रणा म्हणून शासन निर्णयातील मंजूर यंत्रणा यादीमध्ये समाविष्ट नसल्याने नव्याने मान्यता मिळणेबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी सभागृहास विनंती केली. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र.तिक्षेवि-२००८/प्र.क्र.१३७/नवि-१६ दि.३१ ऑक्टोबर २००८ मधील तुळजापूर विकास प्राधिकरणाची कार्यपध्दती पान क्र. १५ मध्ये कामाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यान्वीत यंत्रणेला एजन्सी चार्जेस देय व अनुज्ञेय राहणार नाही असे स्पष्ट नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ६ जानेवारी २००९ मधील प्रकरण तीन विकास प्राधिकरणाची कर्तव्ये, कार्ये आणि अधिकार ७(१)(झ) नुसार तुळजापूर विकास बृहत योजनेखालील कामाची आखणी करणे, त्यास मंजुरी देणे, त्याची अंमलबजावणी करणे किंवा त्याचे

सनियंत्रण करणे याकरीता विकास प्राधिकरणाचे कार्यालयीन काम किंवा अन्य कोणतेही काम पार पाडण्यासाठी, अंशकालिक किंवा पूर्णकालिक तत्वावर कोणत्याही शासकीय व निमशासकीय अभिकरणांच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या वा कर्मचाऱ्याच्या सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करणे; परंतु, एकूण एका महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता पूर्ण कालिक तत्वावर कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा आवश्यक असेल अशा बाबतीत, विकास प्राधिकरण राज्यशासनाची पूर्वपरवानगी घेईल, असे नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी तुळजापूर विकास प्राधिकरणासाठी वरील धर्तीवर पदे भरण्याकरीता मा. सचिव, सा.बां.वि. मुंबई यांना दि. ०७/१०/२०११ व दि. १९/१०/२०११ अन्वये विनंती केली होती. त्या अनुषंगाने उपरोक्त पत्रांचा संदर्भ देवून अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, उस्मानाबाद यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर यांच्या अधिपत्याखालील उपविभागीय अभियंता, मार्ग प्रकल्प उपविभाग उस्मानाबाद व उपविभागीय अभियंता, मार्ग प्रकल्प उपविभाग लातूर या दोन्ही उपविभागाचे मुख्यालय तुळजापूर करून दि. १३ ऑक्टो. २०११ च्या आदेशान्वये तुळजापूर विकास प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यानंतर या कार्यालयाने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान साठी मार्ग प्रकल्प उपविभाग-बीड मु. तुळजापूर व नगर परिषद, तुळजापूर अंतर्गत कामासाठी मार्ग प्रकल्प उपविभाग-उस्मानाबाद मु. तुळजापूर यांना दि.१८/११/२०११ च्या आदेशान्वये नियुक्त केले आहे.

याबाबत सविस्तर चर्चा होवून वरील कामांसाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांच्या दि. १७/०१/२०१४ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या शिफारसीनुसार कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, लातूर ही तुळजापूर विकास प्राधिकरणाची यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी मान्यता देणेबाबत **ठराव क्र.२४०** सर्वानुमते मान्य करण्यात आला. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी याबाबत आदेश निर्गमीत करावे असे ठरले.

**विषय: ७: प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅकेज क्र. १, २ व ३ यांची सेवा संपुष्टात आणणेबाबत.**

**सल्लागार पॅकेज क्र. १**, मधील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या आराखड्यातील किंमत गृहीत धरून रू.२२.८३ कोटी किंमतीची १९ कामे प्रकल्प किंमतीच्या १.६५ % दराने सेवाशुल्कासह **मे. कॅशेक इंजि. प्रा.लि. पुणे** यांना सोपविण्यात आली होती.

सद्य:स्थितीत मे. कॅशेक इंजि. प्रा.लि. पुणे यांचेकडे असलेल्या कामांवर त्यांचा एकही प्रतिनिधी हजर नसल्याचे दिसून आले आहे, त्यामुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम होत असून कामे रेंगाळण्याची शक्यता आहे. सदरील सल्लागाराकडे असलेल्या कामांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

अ. एस.टी. स्टॅंड ते डॉ. आंबेडकर चौक रस्ता- काम पूर्ण

ब. कमानवेस मारुती मंदिर ते डॉ.आंबेडकर चौक- प्रगतीत (३५ %पूर्ण )

सदरील सल्लागार यांनी दि. ११/०९/२०१३ पासून सर्व कर्मचारी वर्ग कमी करण्यात येत असून त्यांचेकडील कामे काढून घेवून करारनाम्यातून मुक्त करणेबाबत मे. कॅशेक इंजि. प्रा.लि. पुणे यांनी या कार्यालयास विनंती केली आहे.

**सल्लागार पॅकेज क्र. ०२** मधील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या आराखड्यातील किंमत गृहीत धरून रू.१४.८२ कोटी किंमतीची २५ कामे प्रकल्प किंमतीच्या १.२३ % दराने सेवाशुल्कासह **मे.एस.एन.भोबे असो.प्रा.लि.मुंबई** यांना सोपविण्यात आली होती. त्यामध्ये निविदापूर्व कामासाठी दि.१६/१२/२०१० चा कालावधी दर्शविण्यात आला होता. निविदा मंजुरीनंतरचा कालावधी त्या-त्या कामाप्रमाणे दर्शविण्यात आला होता.

सद्य:स्थितीत मे. एस.एन.भोबे असो.प्रा.लि.मुंबई यांचेकडे असलेल्या कामांवर त्यांचा एकही प्रतिनिधी हजर नसल्याचे दिसून आले आहे, त्यामुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम होत असून कामे रेंगाळण्याची शक्यता आहे. सदरील सल्लागाराकडे असलेल्या कामांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

अ. घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्तनिवास बांधणे- काम प्रगतीत (८० % पूर्ण)

ब. मंदिराशेजारी भक्त निवास व शॉपींग सेंटर बांधणे- काम अंतिम टप्प्यात (९० %पूर्ण )

क. यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा.२- प्रगतीत (४५ % पूर्ण )

ड. आराधवाडी पार्कींग भाग.१ व भाग.२- काम पूर्ण

इ. बसस्थानकाशेजारी सुलभ शौचालय बांधणे- काम पूर्ण

फ. आ.क्र. ९ आठवडी बाजार वाहनतळ- प्रगतीत (६० % पूर्ण )

ग. उस्मानाबाद रोड वाहनतळ- प्रगतीत (६० % पूर्ण)

सदरील सल्लागार यांनी दि. ३०/११/२०१३ पासून सर्व कर्मचारी वर्ग कमी करण्यात येत असून त्यांचेकडील कामे काढून घेवून करारनाम्यातून मुक्त करणेबाबत या कार्यालयास विनंती केली आहे.

**सल्लागार पॅकेज क्र. ३** मधील तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या आराखड्यातील किंमत गृहीत धरून रू.१४.१२ कोटी किंमतीची कामे प्रकल्प किंमतीच्या १.७७ % दराने सेवाशुल्कासह **मे. सराह कन्सलटन्सी, नाशिक** यांना सोपविण्यात आली होती.

सद्य:स्थितीत मे. सराह कन्सलटन्सी, नाशिक यांचेकडे असलेल्या कामांवर त्यांचा एकच प्रतिनिधी हजर असल्याचे दिसून आले आहे, त्यामुळे कामाच्या प्रगतीवर परिणाम होत असून कामे रेंगाळण्याची शक्यता आहे. सदरील सल्लागाराकडे असलेल्या कामांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे दर्शविली आहे.

अ. पापनाश तलाव सुशोभिकरण करणे- काम प्रगतीत (७०% पूर्ण)
ब. बीडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणे - प्रगतीत (५५ %पूर्ण )
क. बीडकर तलाव ते दर्शनमंडप पायऱ्या करणे- काम पूर्ण
ड. धार्मिक ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय बांधणे-का प्रगतीत (८० % पूर्ण)
इ. घाटशीळ बगीचा सुशोभिकरण- काम पूर्ण

सदरील सल्लागार यांचा माहे मार्च २०१३ पासून एकच कर्मचारी कार्यरत असून त्यांचेकडील कामे काढून घेवून करारनाम्यातून मुक्त करणेबाबत मे. सराह कन्सलटन्सी, नाशिक यांनी या कार्यालयास विनंती केली आहे.

सर्व कामांचे मूळ मंजूर आराखडे, आरसीसी डिझाईन, जागेच्या मालकीची कागदपत्रे, कामाचे बांधकाम परवाने, तसेच निविदेमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर दोष निवारण कालावधी पूर्ण होईपर्यंत संबंधित सल्लागार यांनी सेवा देणे बंधनकारक आहे.

वरील बाबींचा विचार करता सल्लागार पॅकेज क्र. १, २ व ३ कडे सोपविण्यात आलेली कामे काढून घेवून सल्लागारास करारमुक्त करून सर्व कामे त्या-त्या यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या व प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अभियंत्याकडून पूर्ण करून घ्यावीत असे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी असा अभिप्राय दिला आहे.

सदरील विषय चर्चेस आला असता सल्लागारांकडील सर्व कामांचे मूळ मंजूर आराखडे, आरसीसी डिझाईन, जागेच्या मालकीची कागदपत्रे, कामाचे बांधकाम परवाने त्या-त्या यंत्रणेंनी ताब्यात घ्यावीत व निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे सल्लागारांवर दंडात्मक कारवाई करून त्यांची सेवा संपुष्टात आणावी व तसेच त्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचित केले. यापुढे उर्वरित सर्व कामे त्या-त्या यंत्रणेकडे उपलब्ध असलेल्या व प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अभियंत्याकडून पूर्ण करून घ्यावीत असा **ठराव क्र.२४१** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः ८: यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे टप्पा-२ कामास मुदतवाढ देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण उस्मानाबाद अंतर्गत यात्रा मैदान येथे धर्मशाळा बांधणे (टप्पा-२) चे कामास दि.१८/०३/२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले होते. सदर कामाची मुदत १७/०९/२०१२ पर्यंत होती तथापी संबंधीत ठेकेदारास मुदतवाढ देणे बाबत कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार एस.एन.भोंबे असोसिएटस यांच्या अभिप्रायानुसार दि. ०८/०२/२०१३ रोजीच्या बैठकीत दिनांक ३१ एप्रील२०१३ पर्यंत भाववाढ न देता दि. ३१/०५/२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तथापी संबंधीत ठेकेदाराचे पत्र दि.२० मार्च२०१३ , दि. १० एप्रील २०१३, दि. १५ मे २०१३ व दिनांक २०/०८/२०१३ अन्वये तुळजापूर विकास प्राधिकरण कार्यालयाने वाढवुन देण्यात आलेली मुदतवाढ पुन:श्च वाढवुन देणे बाबत मागणी केलेली आहे. त्या नुसार सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी या कार्यालयास दिनांक ११ ऑक्टोंबर२०१३ रोजी पुन:श्च मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करून संबंधीत ठेकेदार यांना अतिरिक्त बाबीस दिनांक १९ जुन २०१३ व २६ ऑगस्ट २०१३ रोजी मानयता देण्यात आली असल्याने दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंत मुदतवाढ देणे बाबात शिफारस केली आहे.

उपरोक्त बाबीचे अवलोकन केले असता संबंधीत ठेकेदारास देण्यात आलेली कार्यारंभ आदेश दि.१८ मार्च २०११ नुसार १८ महिने म्हणजे १७ सप्टेंबर २०१२ व वाढवुन देण्यात आलेली मुदत पाच महिने म्हणजे दि. ३१ मार्च २०१३ व पुन:श्च शिफारस करण्यात आलेली मुदतवाढ १२ महिने म्हणजे दि. ३१ मार्च २०१४ असे उपरोक्त कामास तुळजापूर विकास प्राधीकरण मार्फत एकुण २३ महिने मुदत देवुनही कामाची प्रगती मंजुर निविदा रकमेच्या तुलनेत देण्यात आलेल्या देयकानुसार ४८% इतकी होत आहे. यावरून ठेकेदार यांच्या कामाची प्रगती अत्यंत असमाधानकारक दिसुन येते. या कार्यालयाने संबंधीत ठेकेदारास वारंवार तोंडी व लेखी सुचना दिल्या आहेत. तरी संबंधीत ठेकेदार यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दिनांक १ जुन २०१३ ते दिनांक ३१ मार्च २०१४ पर्यंत दंडात्मक मुदतवाढ द्यावी अशी विनंती मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापूर यांनी या कार्यालयास केली आहे. दि. ३१/१२/२०१३

पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देण्यात यावी असे अभिप्राय अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी दिले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४२** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः ९: पाचुंदा विहिर ते मंगळवार पेठ पाण्याची टाकी नवीन पाईप लाईन करणे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

तुळजापूर शहर नळ पाणी पुरवठा योजनेची (पाचुंदा उदभव ) कांमे नगर परिषदे मार्फत तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत सुरु आहेत. सदर कामासाठी म.जी.प्रा.प्रकल्प व्यवस्थापन व सल्लागाराच्या भुमीकेत आहे. सदर योजनेतील कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) कामाची प्रशासकीय किंमत | रु. १,४२,.४६,५००/- |
| २) कामाची निविदा किंमत | रु. १,२१,९१,२०९/- |
| ३) स्विकृत निविदा किंमत | रु. १,१३,०९,७८४/- |
| ४) कार्यादेश दिनांक. | दि.१९/०९/२०११. |
| ५) काम पुर्ण करण्याची मुळ मुदत | दि. १८/०६/२०१२ |
| ६) कामाची यापूर्वी देण्यात आलेली मुदत वाढ | दि.३०/०९/२०१३ |
| ७) मुळ मुदतीमध्ये झालेल्या कामाची किंमत | रु. ६२, ४२, ७५७/- (५६% काम पूर्ण ) |
| ८) मुळ मुदतीनंतर झालेले काम | रु. ३३३७९००/- ( ३०% काम पुर्ण) |
| ९) योजनेतील समाविष्ठ कामे, जॅकवेल, पंपहाऊसव दाब नलिका ९५% पूर्ण झालेले आहेत. पंपींग मशिनरी उभारणी केलेली आहे. पंपींग मशिनरी व योजनेची चाचणी करणे बाकी आहे.- | १७,२९,१२७/- (१४% काम बाकी) |

सदर कामाच्या मुदतवाढी बाबत संबंधीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सविस्तर कारणासह प्रस्ताव सोबत सादर केला असुन विलंबाची कारणे खालील प्रमाणे असल्याची कळविले आहे.

१) पाटबंधारे खात्याने उदभव विहिरीची जागा निश्चित केल्यामुळे व जलशुध्दीकरण केंद्राजवळ मार्ग बदलल्याने लांबीमध्ये वाढ झाल्याने वाढीव पाईप मागविण्यासाठी विलंब झालेला आहे.

२) पंपींग मशिनरीचा तपशील कंत्राटदारास कळविणेस विलंब झाला आहे.

३) नळदुर्ग रोड क्रॉसिंगचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याच्य परवानगीस विलंब झाला आहे.

४) विजेचे पुरवठयासाठी विज मंडळाने कोटेशन अद्याप दिलेले नाही.

५) सन २०१२ च्या पावसाळयामध्ये तलावामध्ये अपुऱ्या पर्जन्यामानामुळे पाणी साठा झालेला नाही.

त्यामुळे वरील कारणे समर्पक व वस्तुस्थितीनुसार असल्याने संबंधीत ठेकेदारास दि. ३०/०६/२०१४ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४३** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १०: पापनाश तलावाची खोली वाढविणे व सुशोभिकरण करणे कामास मुदतवाढ देणेबाबत**

तुळजापूर विकास प्राधिकरण उस्मानाबाद अंतर्गत पापनास तलावाची खोली वाढविणे व सुशोभीकरण करणे कामाची प्रशाकीय मान्यता किंमत रू.३२५.००लक्ष, निविदा किंमत रू.२००.०० लक्ष आहे. सदरील काम पूर्ण करण्याची मूळ मुदत ३१ मार्च २०१२ पर्यंत होती.

सदरील कामामध्ये निविदा व्यतिरीक्त एकुण रु.७६.०० लक्ष ची अतिरिक्त बाबीची (Extra item) वाढ झालेली असुन आजपर्यंत सुमारे रू.२३०.०० लक्ष चे काम पुर्ण झालेले आहे व कंत्राटदारास आजपर्यंत एकुण रू.१९०.०० लक्षाची देयके अदा केलेली आहेत. सदरील कामातील बगीचातील फरशी, विद्युतीकरण व रंगकाम इ. कामे करावयाची राहीलेली आहेत. यापुर्वी २० जून २०१३ अखेर पर्यंत निर्देशांक गोठवून मुदतवाढ दिलेली असुन कंत्राटदाराने त्यांचे दि.१५/११/२०१३ चे पत्रान्वये पावसाळा, रेतीटंचाई, अतिरिक्त बाबीमुळे निविदा किंमतीपेक्षा झालेली वाढ यामुळे डिसेंबर २०१३ अखेपर्यंत मुदतवाढ मागितली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व उप विभागीय अभियंता यांनी मुदतवाढ देणे बाबत शिफारस केली आहे. सदरील कामातील अतिरिक्त बाबीच्या प्रस्तावास मा. अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ उस्मानाबाद यांनी मंजुरी दिलेली आहे. कंत्राटदाराच्या कामाची प्रगती बारचार्ट प्रमाणे नसल्यामुळे १ ऑक्टोंबर २०१३ पासुन प्रतीदिन रू.१५००/- दंडासहीत डिसेंबर २०१३ अखेर पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित करण्यात येत आहे व कामाची झालेली वाढ ही प्रशासकीय मंजुरीच्या आत असल्याने कामाची अतिरिक्त बाबीचा प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत व्यवस्थापक श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांनी या कार्यालयास विनंती केली आहे. दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देण्यात यावी असे अभिप्राय अधीक्षकअभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी दिले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४४** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः ११: तुळजापूर शहर नळ पाणी पुरवठा योजना भाग-१ कामास मुदतवाढ देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत तुळजापूर पाणी पुरवठा योजना भाग-१ कामाची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. कामाची अंदाजे मंजूर किंमत रू. २७८१.९० लक्ष

२. निविदा किंमत रू.१२१३.९० लक्ष

३. एजन्सी-मे. लक्ष्मी इंजि. सर्विसेस प्रा.लि. कोल्हापूर

४. कामाचे आदेश दि.१८/०३/२०११

५. कामाची मूळ मुदत १२ महिने म्हणजे दि. १७/०३/२०१२

सदरील निविदाची मूळ मुदत दि.१७/०३/२०१२ रोजी पूर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९६ नुसार सदर योजनेस दि.३१/१२/२०१२ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली. तसेच दि.०५/०७/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. २२७ अन्वये दि.३१/१२/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली. उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कळंब मुख्यालय तुळजापूर यांनी योजनेचे काम मुदतीत न होण्याची कारणे खालीलप्रमाण नमूद केलेली आहेत.

१) वीज मंडळाकडून कोटेशन अद्याप अप्राप्त आहे. वीज जोडणी झाल्याशिवाय योजनेची चाचणी देणे शक्य नाही.

२) जलशुध्दीकरण केंद्राची चाचणी देणे प्रलंबीत आहे.

३) भिमनगर येथे डी.आय.पाईप ऐवजी जी.आय. पाईप १२५० मी. टाकणेचा अतिरिक्त बाबींचा प्रस्ताव अद्याप मंजूर नाही.

४) शुक्रवार पेठ रस्त्यावरील अतिक्रमण दूर न झाल्याने २०० मी. लांबीची पाईप लाईन टाकणे प्रलंबित आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता ठेकेदारास सर्व किरकोळ कामे चाचणीसह पूर्ण करण्याकरीता दि.३०/०६/२०१४ अखेर पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्याकरीता या कार्यालयास विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४५** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १२: तुळजापूर शहर भुयारी गटार योजना भाग-१ कामास मुदतवाढ देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत भुयारी गटार योजना भाग-१ कामाची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे

१. कामाची अंदाजे किमंत रू. ३१८९.८६ /- लक्ष

२.स्विकृत निविदा किंमत रू.१६१४.७६/- लक्ष

३. एजन्सी - मे. प्रगती कन्ट्रक्शन चाकूर

४. कामाचे आदेश पत्र क्रं.१४९ दि.०४/०२/२०११

५. कामाची मुदत १२ महिने म्हणजे दि.०३/०२/२०१२ पर्यंत

सदर निविदाची मुळ मुदत दि.०३/०२/२०१२ रोजी पुर्ण झालेली होती. ठेकेदाराच्या विनंती अर्ज व तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या दि.२८/०७/२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र.१९६ नुसार सदर योजनेस दि.३०/०१/२०१३ पर्यंत भाववाढीसह मुदत वाढ मंजुर करण्यात आली. तसेच दि. ०५/०७/२०१३ रोजी संपन्न झालेल्या तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ गोठवून ठराव क्रं २२७ नुसार मुदतवाढ मंजुर करण्यात आली.

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कळंब मुख्यालय तुळजापूर यांनी संदर्भीय पत्रानुसार योजनेचे काम मुदतीत न होण्याची कारणे खालील प्रमाणे दिली आहेत.

१) भूयारी गटार वितरीका :- झोन ६ मध्ये रोड डिमार्केशन नसल्याने काम अपूर्ण आहे.

२) साठवण टाकी व पंपगृह झोन क्रं ६ :- झोन क्रं ६ मधील साठवण टाकीची जागा नगर परिषदकडे पाठपुरावा करुन देखील अद्याप पर्यंत प्राप्त झाली नसल्याने काम सुरु झाले नाही. व सदर साठवण टाकीसाठी आवश्यक त्या जागेचे Compulsary Land Aquisation चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

३) गटार ऊर्ध्ववाहिनी :- संपवेलची जागा निश्चित नसल्यामुळे काम करता येत नाही.

४) पंपीग मशनरी झोन क्रं ६ करीता :- संपवेलची जाग निश्चित नसल्यामुळे काम करता येत नाही.

५) स्ट्रॅाम वॅाटर व युटिलिटी ड्रेन :- शुक्रवार पेठ रस्ता रुंदीकरणाचे काम अर्धवट असल्याने पाईप लाईन टाकता येत नाही.

६) झोन क्रं १, २, ३, ४ चे काम पूर्ण झोन क्रं ५ मध्ये ३५० मीटर बाकीउपरोक्त बाबीचा विचार करता ठेकेदारास झोन क्रं १, २, ३, ४, ५ व झोन क्र.६ मधील रोड डिमार्कनेशन, संप व पंपहाऊससाठी लागणारी जागा अद्याप पर्यंत उपलब्ध न झाल्याने झोन क्र.६ मधील कामे अपुर्ण असून झोन क्र.६ मधील उर्वरीत कामे पुर्ण करण्यासाठी संप व पंपहाऊसची जागा ताब्यात मिळाल्यापासून कमीत कमी चार महिन्याचा कालावधी लागणार आहे. झोन क्र.६ मधील उर्वरीत कामे सध्या अस्तीत्वात आसलेल्या निविदेस भाववाढीसह मुदतवाढ देऊन करणे योग्य ठरेल. कारण सद्याची निविदा सन-२००९-१० च्या दरसुचीवर आधारीत असून १.९९ % इतकी जादा आहे. उर्वरीत कामाची फेर निविदा काढल्यास नवीन दरसुची सन-१३-१४ ने काढावी लागेल व निविदा प्रक्रीया पुर्ण होण्यास बराच कालापव्यय होईल.

उपरोक्त बाबींचा विचार करता ठेकेदारास झोन क्र. १ ते ५ (झोन क्र.६ वगळून) मधील सर्व किरकोळ कामे पुर्ण करुन चाचणीसह पुर्ण करण्याकरीता दि.३१/३/२०१४ अखेर पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्याकरीता व उपविभागीची शिफारस पहाता

काम पुर्ण होण्याच्या हेतूने दि.३१/०३/२०१४ अखेर पर्यंत मुदत वाढ मंजुर करणेबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उस्मानाबाद यांनी शिफारस केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४६** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १३. बीडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत बिडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणेच्या कामास तुळजापूर विकास प्राधिकरण मार्फत दि. ०४/०९/२०१० रोजी ठराव क्र. ६२ अन्वये ६७५.०५ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक रु. ५,७९,८९,४०६/- चे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, सराह कन्सलटंन्सी नाशिक, यांनी तयार करुन मा. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम औरंगाबाद यांच्या कडुन तांत्रिक मान्यता घेण्यात आली. त्यानुसार नगर परिषदे मार्फत सर्व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दि. ०९/०६/२०११ रोजी एम.एस. कन्स्ट्रक्शन, इंजि ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर, लातुर, यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. याच कामात बिडकर तलाव येथे कारंजे, फिल्टरेशन,गोमुख बसविण्याच्या कामाचा समावेश करण्यात आले त्याची निविदा रक्कम अनुक्रमे रु. ८.९४ लक्ष, १२.७९ लक्ष व ३.१२ लक्ष इतकी असुन या कामाचे दिप ॲग्रो सर्व्हीस औरंगाबाद यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले.

सदर कामाच्या सर्व तांत्रिक बाबी करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सराह कन्सलटंन्सी नाशिक यांची जबाबदारी आहे. मुळ मंजुर अंदाजपत्रकात बॉक्स फुटींगची तरतुद होती. पण प्रत्यक्ष साईटवर दलदलीचा भाग असल्याने त्या ठिकाणी बॉक्स फुटींग ऐवजी हार्ड मुरुम, सोलिंग, Plumb PCC बाबी करुन नव्याने Design करुन Raft foundation प्रस्तावित करण्यात आले . तसेच फिल्टरेशन बसविणे कामाच्या निविदेत एकाच टँकचे समाविष्ठ असल्याने प्रत्यक्षात प्रस्तावित दोन्ही टँक करिता फिल्टरेशन अतिरिक्त बाबीचा खंड -३८ चे प्रस्ताव म.जी.प्रा विभागाकडे सादर करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पाची किमत वाढत असुन प्रकल्पाची एकूण किमत रु. ९५९.५३ लक्ष होत असल्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी कळविले आहे. प्रत्यक्ष जागेवरील परिस्थीती विचारात घेता हे बदल करणे आवश्यक होते. त्यामुळे यापूर्वी देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रु. ६७५.०५ लक्ष किंमतीत रु. २५४.४९ लक्ष इतकी वाढ होत आहे. तरी सदर कामासाठी रु. ९५९.५३ लक्ष इतक्या किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी विनंती मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी या कार्यालयास केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचे अभिप्राय घेवून सदरील विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे मा. अध्यक्ष महोदयांनी सूचित केले.

**विषयः १४. बीडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत बिडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणे कामास तुळजापूर विकास प्राधिकरण मार्फत दि. ०४/०९/२०१० रोजी रु. ६७५.०० लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार सदर कामास नगर परिषदेस मार्फत दि. ०९/०६/२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यानुसार सदर कामाची मुळ मुदत १५ महिने म्हणजे दि. ०८/०९/२०१२ पर्यंत होती.

तथापि सदर कामाच्या येणाऱ्या अडचणीमुळे तुळजापूर विकास प्राधिकरण सर्वसाधारण बैठक दि. ०८/०२/२०१३ रोजी सदर कामास दि. ३१/१२/२०१२ पर्यंत भाववाढीसह व त्यानंतर भाववाढ निर्देशांक गोठवुन दि. ३१/१२/२०१३ पर्यंत मंजुर करण्यात आली होती.

तथापि सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सराह कन्सलटंन्सी नाशिक यांनी संदर्भ क्र.१ अन्वये सदर कामा मध्ये झालेल्या तांत्रिक बदलाची (अतिरिक्त बाबीची) मंजुरी प्रत दि. २६/०८/२०१३ रोजी प्राप्त झाली. त्यानुसार पुढील कामे चालु असुन बदल झालेल्या Design मुळे वाया झालेला कालावधी लक्षात घेता सदर कामास दि. ३१/०७/२०१४ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२४७** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १५. बीडकर तलाव येथे कारंजे, गोमुख व फिल्टरेशन बसविणे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने १) तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत बीडकर तलाव येथे कारंजे बसविणे दि.०१/१०/२०११ मुदत १२ महिने दि.३०/०९/२०१२ पर्यंत होती.२) बिडकर तलाव फिल्टर बसविणे दि.०१/०९/२०१२ मुदत १२ महिने दि.३१/१०/२०१३ पर्यंत होती. ३) तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत बीडकर तलाव येथे गोमुख बसविणे दि.०१/९०/२०१२ मुदत १२ महिने दि.३१/१०/२०१३ पर्यंत होती.

तथापी सदर कामांना भाववाढ खंडासह मुदत वाढ मिळणेबाबत संबंधित ठेकेदाराने विनंती केली होती. त्यानुसार सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सराह कन्सलटंन्सी, नाशीक यांनी सद्यः स्थितीमध्ये बिडकर तलाव विकसीत करणे कामातील कुंड क्र.१ व २ चे बांधकाम चालु असुन हे काम पूर्ण होई पर्यंत लागणाऱ्या वेळेमुळे उपरोक्त तीन्ही कामास ऑगस्ट २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. तरी उपरोक्त विषयांकित काम हे बिडकर तलाव येथे बगीचा विकसीत करणे कामाच्या प्रगतीवर अवलंबुन असल्याने जोपर्यंत सदरचे काम पूर्ण होत नाही तो पर्यंत त्याठिकाणी कारंजे, गोमुख व

फिल्टरेशन बसविणेचे काम करता येत नाही. तरी विषयांकित कामास ऑगस्ट २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर यांनी या कार्यालयास विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून विषयांकीत कामास यंत्रणेकडून प्रस्तावित केल्याप्रमाणे ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत भाववाढ न देता मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २४८** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १६: घाटशीळ परिसरात १०८ खोल्यांचे भक्त निवास बांधणे या कामास मुदतवाढ देणेबाबत.**

या कामास रू. १३८५.०० लक्षची प्रशासकीय मान्यता किंमत असून रू. १०८२.०० निविदा किंमत आहे. मे. एम.एस. देशमुख अँड सन्स, लातूर यांचेकडे काम असून या कामाची मूळ मुदत दि.०१/१०/२०१३ पर्यंत देण्यात आलेली होती. सध्या निविदेप्रमाणे ८५ % काम पूर्ण झाले असून उर्वरित १५% प्रगतीपथावर आहे.

या कामावरील अतिरिक्त कामे पूर्ण करण्याकरीता संबंधित कंत्राटदाराने दि.२६/०९/२०१३ च्या पत्रान्वये दि. ३०/०३/२०१४ पर्यंत भाववाढीसह मुदतवाढ मागितली आहे. आतापर्यंत कामावर रू. ६८८.०० लक्ष खर्च झाला असून सध्या देय रक्कम रू. ८५.०० लक्ष आहे. परंतु संबंधित कंत्राटदाराने कामाची गती न राखल्याने दंड म्हणून दिनांक ३०/०९/२०१३ ते ३०/०३/२०१४ पर्यंत भाववाढ निर्देशांक गोठवून मुदतवाढ देणेबाबत सल्लागार मे. एस.एन.भोबे असो. प्रा.लि.मुंबई यांनी प्रस्तावीत केले आहे. कामार्च सर्व मजले पूर्ण झाले असून बाहेरील बाजूचा गिलावा, फ्रंट इलेव्हेशन, टाईल्स, दरवाजे, खिडक्या व रंगकाम बाकी आहे. या कामास मुदतवाढ देणेबाबत तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून विषयांकीत कामास यंत्रणेकडून प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.३०/०९/२०१३ ते ३०/०३/२०१४ पर्यंत भाववाढ खंड निर्देशांक गोठवून व दि.०१/०४/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र. २४९** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १७. मंदिराशेजारी भक्त निवास व शॉपींग सेंटरचे बांधकाम करणे या कामास मुदतवाढ देणेबाबत.**

या कामास रुपये 651.35 लक्षची प्रशासकीय किंमत असू निविदा किंमत रुपये 225.00 लक्ष आहे. हे काम श्री डी. एस. हालकुडे,कंत्राटदार लातुर यांचेकडे असून या कामाची काम पुर्ण करण्याची मुळ मुदत 03 जुलै 2012 होती. परंतु जुनी ईमारत पाडणे व जागा ताब्यात घेण्यास विलंब लागला तसेच काळी माती लागल्याने तळमजल्याचे अतिरिक्त काम करावे लागले होते. त्यामुळे यापुर्वी दिनांक 31/03/2013 पर्यंत मुदतवाढ मिळालेली असून जानेवारी 2013 पर्यंत भाववाढीसहीत व फेब्रुवारी 2013 व मार्च 2013 पर्यंत भाववाढ निर्देशांक गोठवून मुदत वाढ मंजुर करण्यांत आली होती. त्याप्रमाणे काम पुर्ण झ ाले होते त्यानंतर संरक्षक भिंत व ईमारती सभोवतालचा परीसर सुधारणा करणे ही निविदाबाहय कामे करावी लागत असल्यामुळे सबंधीत ठेकेदारानी दिनांक 12 ऑगस्ट 2013 पत्रान्वये नोव्हेंबर 2013 अखेर पर्यंत मुदत वाढ मागीतली आहे. या कामाचे सल्लागार व उपअभियंता यांचेकडून या कामासाठी भाववाढीसह 31 मार्च 2013 ते 30 नोव्हेंबर 2013 पर्यंत मुदतवाढ प्रस्तावीत करण्यांत आली आहे.

सध्यस्थितीत तळमजल्यात पार्टीशन बसवणे, परीसर सुधारणा, किरकोळ कामे तसेच विद्युतीकरणाचे व संडास बाथरुमची अंतर्गत फिटींग बसवणे बाकी आहे. सध्या या कामावर रुपये 392.51 लक्ष इतका खर्च झाला आहे. या कामास मुदतवाढ देणेबाबत तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३०/११/२०१३ पर्यंत पूर्वीप्रमाणे भाववाढ खंड गोठवून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२५०** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १८: धार्मिक ग्रंथालय व वस्तु संग्रहालय अद्यावत करणे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

या कामाकरीता रु. 41.00 लक्षची प्रशासकीय मान्यता असुन निविदा किंमत रु. 47.00 लक्ष आहे. हे काम मे. भाग्यश्री कन्स्ट्रक्शन, लातूर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.11% जास्ती दराने करीत आहेत. काम पुर्ण करणेची मुळ मुदत दिनांक 28/09/2013 पर्यंत होती. सदरील कामामध्ये फेरोसिमेंट कॉक्रीट आर्च डिझाईनचे कामाची रु. 16.00 लक्षची अतिरीक्त बाबींची वाढ होणार असून अद्याप त्यास अधिक्षक अभियंता सा.बां. मंडळ, उस्मानाबाद व तुळजापूर विकास प्राधिकरण सर्वसाधारण सभेची मान्यता नसल्यामुळे कामे केलेली नाहीत. अतिरीक्त बाबींचे मान्यतेचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, उस्मानाबाद यांचे कार्यालयात प्रलंबित आहे. आजपर्यंत सुमारे 40.00 लक्षचे काम पुर्ण झालेले असून कंत्राटदारास रु. 30.00 लक्षची देयके अदा केलेली आहेत. कंत्राटदारास यापुर्वी जुन 2013 अखेरपर्यंत भाववाढ गोठवून मुदतवाढ दिलेली आहे. कंत्राटदाराने त्यांचे दिनांक 16/11/2013 चे पत्रान्वये अद्याप अतिरीक्त बाबींचे खर्चास व सुधारीत प्रशासकीय मान्यतेस तुळजापूर विकास प्राधिकरणाची मंजूरी नसल्याने डिसेंबर 2013 अखेरपर्यंत मुदतवाढ मागीतली आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचे कंत्राटदारास 31 डिसेंबर 2013 अखेरपर्यंत भाववाढ निर्देशांक गोठवून मुदतवाढ देणे बाबत तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून दि. ३१/१२/२०१३ पर्यंत भाववाढ खंड गोठवून व दि. ०१/०१/२०१४ पासून रू. १००/- प्रतिदिन दंड आकारून मुदतवाढ देणेबाबत **ठराव क्र.२५१** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः १९. धार्मिक ग्रंथालय व वस्तु संग्रहालय अद्यावत करणे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

सदरील कामास रुपये 41.01 लक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्याकरीता खालील प्रमाणे सुधारीत खर्च अपेक्षीत आहे.

| | |
|---|---|
| 1) निविदा किंमत | रुपये 47.00 लक्ष |
| 2) फेरोसिमेंट कॉक्रीट, आर्चेस इत्यादी अतिरीक्त बाबी | रुपये 13.00 लक्ष |
| 3) भाववाढ | रुपये 05.00 लक्ष |
| 4) ज्वेलरी इमिटेशन, वस्तु संग्रहालय अदयावत करणे | रुपये 35.00 लक्ष |
| एकुण | रुपये 100.00 लक्ष |

सदरील कामाकरीता सुधारीत रुपये 100.00 लाख किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मंजुर करणेबाबत तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून रू. १००.०० लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय देणेबाबत **ठराव क्र.२५२** सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**विषयः २०. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये ५ कि.मी. परिसरातील विकास आराखडाबाबत हद्द ठरविणे व नियोजन प्राधिकरण घोषित करणेबाबत.**

दि. ३१ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयानुसार तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून सदर शासन निर्णयातील परिशिष्ट 'क' मधील परिच्छेद 'अ' मध्ये तुळजापूर नगर परिषद हद्दीच्या सभोवतालच्या ५.०० कि.मी. परिसराच्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे व त्यास शासनाची मान्यता घेणेबाबत उल्लेख आहे व परिच्छेद 'ई' मध्ये तुळजापूर शहर व त्यांच्या ५ कि.मी. परिसरातीलच कामे प्राधिकरणामार्फत पार पाडले जातील. तथापि, शासनाने मंजूर केलेल्या विकास आराखड्यातील कामांबाबत ५ कि.मी.ची अट लागू राहणार नाही असा उल्लेख आहे. त्याच्या सिमा निश्चितीबाबत शासनाची मान्यता घेणे व तद्नंतर सदर क्षेत्राची विकास योजना तयार करणे क्रमप्राप्त असल्याचे नगररचनाकार, उस्मानाबाद यांनी दि.१९/१२/२०४ अन्वये कळविले आहे.

शासनस्तरावर तुळजापूर नगर परिषद हद्दवाढ प्रस्तावित आहे. सदर हद्दवाढ मंजूर झाल्यास हद्दवाढीसाठी विकास योजना तयार करणे बंधनकारक आहे. अशा परिस्थितीमध्ये नगर परिषद हद्दीबाहेरील ५.०० कि.मी.परिसराची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे काय? सदर परिसरामध्ये प्राधिकरणाचे प्रस्ताव आहेत काय? ५.०० कि.मी. परिसराचा नकाशा तयार करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत बैठकीमध्ये चर्चा करून शासनास प्राधिकरणामार्फत कळविणे आवश्यक असल्याचे नगररचनाकार यांनी या कार्यालयास कळविले आहे.

तुळजापूर नगर परिषद हद्द वगळता ५.०० कि.मी. परिसरात सद्यःस्थितीत प्राधिकरणाची कोणतीही कामे प्रस्तावित नाहीत. शासनस्तरावर तुळजापूर नगर परिषदेची हद्दवाढ प्रस्तावित असल्याने ती मंजूर झाल्यास विकास योजना तयार करणे बंधनकारक आहे. सद्यःस्थितीमध्ये न.प.हद्दीतील प्राधिकरणाची कामे ७५% पूर्ण झालेली आहेत व येथे येणाऱ्या भाविकांसाठी मूलभूत सेवा, सुविधा इ. कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. तद्नंतर सदर प्राधिकरण उद्दिष्ट पूर्ण झाल्यामुळे विसर्जित करणे क्रमप्राप्त आहे. करीता म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये तुळजापूर विकास प्राधिकरणास विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करणे व तुळजापूर विकास प्राधिकरणामार्फत ५.०० कि.मी. परिसराची विकास योजना तयार करण्याची आवश्यकता नाही असे समितीने सूचित केले.

सर्व उपस्थितांचे जिल्हा नियोजन अधिकारी तथा सदस्य सचिव, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी आभार व्यक्त करून मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

**स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीत.**

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
तुळजापूर विकास प्राधिकरण
उस्मानाबाद करीता